# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २६/०४/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २६/०४/२०१३ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. १८/०४/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
३. श्री. मुन्ना सिंह
४. श्री. प्रमोद जयराम सामंत
५. श्री. राजेश शंकर वेतोसकर
६. श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन
७. श्री. रोहिदास शंकर पाटील
८. श्री. शरद केशव पाटील
९. श्रीम. मिरादेवी यादव
१०. डॉ. राजेंद्र जैन
११. श्री. संदिप मोहन पाटील
१२. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील
१३. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी

**गैरहजर सदस्य –**

१. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
२. श्रीम. अनिता जयवंत पाटील
३. डॉ. रमेश जैन

**मा. सभापती :-**

नमस्कार सर्व सदस्याचे हार्दिक स्वागत. सचिव साहेब सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २६/०४/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२, दि. १८/०४/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, सगळे अधिकारी हजर आहेत का ते सांगा. आपण गेल्या मिटींगला बोललो होतो सगळे अधिकारी, सगळे वॉर्ड ऑफिसर ह्या मिटींगला हजर पाहिजेत तर हजर आहेत का?

**मुन्ना सिंह :-**

जो हजर नही रहेगे उनपर कारवाई करने की बात की थी।

**मा. सभापती :-**

ऐसा है की २ अधिकारी कोर्ट मे गये है। उन्होने मुझे फोन किया था। और प्रभाग कार्यालय ३ के अधिकारी है वह कारवाई करने के लिए मुन्शी कंम्पाऊंड में गये है, उनका मुझे फोन आया था।

**शरद पाटील :-**

ज्यांनी परवानगी घेतली ते नाही आहेत . पण त्याच्या व्यतिरिक्त अधिकारी आहे का?

**नगरसचिव :-**

२ प्रभाग अधिकारी आहे. भांडार विभाग आहे, आरोग्य विभाग आहे, एम.एस.डब्लू आहे, महिला बालकल्याण आहे.

**प्रशांत दळवी :-**

प्रभाग क्र. ३ आणि ४ चे प्रभाग अधिकारी आहेत का?

**नगरसचिव :-**

प्रभाग क्र. ४ आणि २ चे आहेत.

**रोहिदास पाटील :-**

शिक्षण चे कोण आहेत ?

**शरद पाटील :-**

शिक्षणचे नाही. वृक्ष प्राधिकरणचे नाही.

**नगरसचिव :-**

उपायुक्त आहेत.

**शरद पाटील :-**

आपण कशाला बोलायचे नंतर की, आपण त्यांच्यावर कारवाई करू की नको करू. कोण नसेल तरी चालेल.

**रोहिदास पाटील :-**

सही साठी माणुस पाठवावा. ठराव मांडा अनुमोदन घे. सही नंतर घे.

**नगरसचिव :-**

आपण सगळ्यांना अजेंडा देतो. त्याची पोच असते.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल रूलिंग होत की पूढच्या वेळेपासून हजर नाही राहिले तर आम्ही त्यांच्यावर कारवाई करु. आणि प्रत्येक वेळेला तुम्ही सांगाल पुढच्या वेळेला, पुढच्या वेळेला ते जर अस मानतच नसतील तर कस चालेल.

**रोहिदास पाटील :-**

हा अपमान कोणाचा? मा. सभापती साहेबांचा की, मुख्यालय उपायुक्तांचा की सचिवांचा किंवा ह्या सभागृहाचा?

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

ह्याच्यामध्ये ऑलरेडी स्टॅन्डिंगने इस्ट्रक्शन त्यावेळी दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुमच ते मानत नाही का ?

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

विधायक कारणासाठी तर जे हजर नसतील तर त्याचा विचार करायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

प्रश्न असा आहे की, विधायक जर कारण असेल तर सभागृह पण मान्य करेल पण त्याने तस रिपोर्टींग करायला पाहिजे. दोन ओळी लिहायला पाहिजे. मॅसेज द्यायला पाहिजे.

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

माझ्या माहिती प्रमाणे प्रभाग अधिका-यांनी मा. सभापती साहेबांची अनुमती घेतलेली आहे. आणि माझ्या माहितीप्रमाणे दोन विभाग प्रमुख रजेवर आहे. एक संगणक विभागाचे आणि आस्थापना विभागाचे. बाकीचे गैरहजर असणार कोण आहे इथे?

**राजेंद्र जैन :-**

नगरसेवक आते है ना तो बाहर साईन करते है। अभी आपको जो बोला रुलिंग दिया वह होना चाहिए। तो आप बोलते है की, मुझे सुचना दिया। आपको मौखिक सूचना देने का कोई मतलब नहीं आता है। ऐसा कुछ नियम करने का है? इसे अच्छा बाहर एक रजिस्टर रखो उसमें उसका एन्ट्री होना चाहिए। कनिशनर साहब बोलते है माझ्या माहितीप्रमाणे. अभी यहाँ पर माहिती प्रमाणे का क्या बात है। रजिस्टर नही रहेगा तो क्या मालुम रहेगा की, कौन क्यों नहीं आया, कैसे आया। इसका सिस्टम चालू क्यों नहीं करते। बाहर एक रजिस्टर रखो। हर बात पे इतना बात क्यों करना पडता है।

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

विधायक कार्यालयीन कामकाजा शिवाय ज्या विभाग प्रमुखाने उपस्थित रहायला पाहिजे. कार्यालयीन कामकाजा शिवाय, विधायक कामकाजा शिवाय जे गैरहजर असतील त्या कारणा शिवाय त्यांना लेखी सुचित मेमो किंवा नोटिस देण्यात येईल. त्यांचा खुलासा मागवण्यात येईल. तो जर समाधान कारक नसेल तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यासाठी मा. आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण ठराव करतो चर्चा करतो. अधिकारी आपल्याला सांगतात. पुढच्या सभेमध्ये सांगु या. आपण ही सांगतो पुढच्या सभेत. म्हणजे जस आपण मा. महासभेमध्ये अनुपालन अहवाल सादर करतो. स्थायी समितीच पण अनुपालन अहवाल देण गरजेच आहे. का मिळत नाही? कोण देणार?

**नगरसचिव :-**

पुढच्या सभेत सगळ्या विभागाकडुन घेऊन दिला जाईल.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, प्रत्येक वेळेला आम्ही बोलल्यानंतरच तुम्ही देता त्याच कारण काय ते सांगा.

**नगरसचिव :-**

मा. महासभेमध्ये सुरुवात होती. स्टँडींगमध्ये नव्हती. तर आता स्टँडींगला सुरुवात करुन देवू.

**शरद पाटील :-**

साहेब विषय असा आहे. प्रभाग अधिकारी दोनचे इथे आहेत. पहिल्या मिटींगला कमिशनर साहेब आले होते. तेव्हा काकांनी सांगितल होत. जे फेरिवाले ना फेरिवाले क्षेत्र आहे. आज आम्ही बोलून बोलून थकलो. लोक आम्हाला बोलतात. बी.पी. रोडला चालायला रस्ता नसतो. पण त्याच्यावर आजतायत एकदाही कारवाई झाली नाही. त्याच कारण काय ते आम्हाला सांगा. पहिल्या मिटींगला जे विचारल होत, मध्ये सुध्दा विचारल होत. ह्याच्यानंतर केबीन रोड, बी.पी. रोड, नवघर रोड यावर कारवाई होत नाही. कारण काय? कारवाई का करत नाही?

**मा. उपायुक्त :-**

ह्याबाबत प्रभाग अधिकारी सांगु शकतील की, कोणत्या कोणत्या तारखेला तिथे कारवाई केलेली आहे.

**दिलीप जगदाळे :-**

साहेब मी दोन दिवसांपूर्वी चार्ज घेतलेला आहे.

**मा. उपायुक्त :-**

अगोदर ज्या-ज्या तारखेला तुम्ही केल आहे. तीन महिन्यात त्याची डिटेल द्याना. तुम्ही किती साहित्य जप्त केले आहे? किती लोकांचे गुन्हे दाखल केले आहे आतापर्यंत ते सांगा.

**शरद पाटील :-**

मागचा रेकॉर्ड असेल ना.

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

दैनंदिन रिपोर्ट पण आहेत ना. त्या प्रभागामध्ये दैनंदिन कारवाई सकाळी आणि संध्याकाळी दररोज करायची आहे.

**शरद पाटील :-**

तोंडी पण सांगा ना. किती कारवाई केली आहे? मी पहिल्या मिटींगपासून बोललो. मला तर वाटत नाही त्याच्यानंतर बी.पी. रोड वर एकदाही कारवाई झाली असेल पण, तुम्ही सांगु तर शकाल ना की, दोन दिवसांपूर्वी कारवाई केली, वीस दिवसापूर्वी केली की, तीन महिन्या अगोदर केलेली तेवढा तरी रिपोर्ट तुम्हाला माहित असेल ना.

**मा. सभापती :-**

सावंत साहेब, तुम्ही तशी काही कारवाई केली असेल तर सभागृहासमोर सांगा ना.

**दिपक सावंत :-**

सर, फेरीवाल्यांवर कारवाई होते.

**शरद पाटील :-**

फेरिवाले पथक म्हणजे कोण? सावंत साहेब फेरिवाले पथक कारवाई करतात पण ते तुम्हाला माहित तर असेल ना.

**दिपक सावंत :-**

फेरिवाले पथक कारवाई करतात.

**शरद पाटील :-**

ऑगस्टला आपल इलेक्शन झाल. ऑगस्ट पासून पहिल्या स्टँडिंगला हा विषय निघालेला आहे.

**दिपक सावंत :-**

तेव्हा माझ्याकडे चार्ज नव्हता.

**शरद पाटील :-**

साहेब मग विचारायच कोणाला? त्यांच्याकडे अतिरिक्त चार्ज होता. आम्ही विचारायच कोणाला ते तरी सांगा ना.

**मा. उपायुक्त :-**

सावंत साहेब, त्यांचा असा आक्षेप आहे की, त्या रोडला कारवाई अजिबात केली जात नाही.

**शरद पाटील :-**

केबीन रोड स्टेशनपासून चालू होते सावंत साहेब, जगदाळे साहेब, मी तुम्हाला भंगार वाल्याच सांगितले. तो रस्ता नेहमी तिथे बंद असतो. त्या भंगारवाल्याने अजून उचलल नाही.

**दिपक सावंत :-**

चालू आहे रस्ता.

**शरद पाटील :-**

नाही आहे. मी आता तिथुनच आलो.

**रोहिदास पाटील :-**

जगदाळे साहेब, सभापती साहेब, दोन कामे आहेत. त्या कामामध्ये एक सार्वजनिक रस्त्यावरच आहे. दुसर महापालिकेची प्रॉपर्टी आपण निट टिकवण असा एक विषय आहे. आपण शाळेच्या इमारतीसाठी महापालिकेने लाखो रुपये खर्च करुन त्या दोन प्रभागाची शाळा किंवा प्रभाग ऑफिस स्वच्छ केल. तलाव नीट स्वच्छ केल. गार्डन निट विकसित झाली. त्या गार्डनच्या आपल्या कंम्पाऊंडला गोणपाट बांधल. पत्रे बांधले. बफिंग वाल्यांचा कचरा गार्डनमध्ये रोज आम्ही नगरसेवकाने उभ रहायच आणि ते साफ करुन घ्यायच. आम्ही पत्र दिल की, आपल्या प्रॉपर्टी पासून त्यांची भिंत आहे. त्याच्यामध्ये दहा ते पंधरा फुटीचा अंतर आहे. त्या भिंतीला दोन फुट तीन फुटच काय असेल ते ठेवून आपल्या गार्डनला नाही लागायला पाहिजे. त्याच्यावर काही कारवाईच नाही. म्हणजे १०० फुट जागा घ्यायची आणि २०० फुट बाहेर वापरायची. अशी पध्दत आहे. तुम्ही अधिकारी आहात. तुम्हाला दुसरी एक विनंती करतो. संपूर्ण इंडस्ट्री इस्टेटमध्ये जिथे गोणपाट बांधलेल आहे ना ती काढा हवा खुली करा. रोगराई येत चालली. त्याच घाणीमध्ये तेच कामगार काम करतात. काळोखामध्ये काम करतात. कारखानदारची भूमिका अशी आहे की, जागा आपण एवढी घेतली. बाहेर सगळी गोणपाट बांधा.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता तो विषय झाला अतिक्रमणचा. दुसरा विषय असा आहे फेरिवाल्यांचा की, आपल्या ॲग्रीमेंट प्रमाणे ठेकेदाराने ना फेरिवाला क्षेत्रामध्ये पैसे वसुल करायला नाही पाहिजे. तरी आजही ठेकेदार त्या ना फेरिवाला क्षेत्रामध्ये पैसे वसूल करतात. त्याच्यावर काय कारवाई होते?

**प्रशांत दळवी :-**

अतिक्रमणचे कोण अधिकारी आहेत का? साहेब आता आमचे सन्मा. सदस्य जे बोलले शरद पाटील साहेब त्याप्रमाणे मी तुम्हाला सांगतो ठेकेदार ना फेरिवाला क्षेत्रातुन तर वसुली करतातच परंतु, आज तर तुम्हाला सांगतो त्या ठेकेदारांनी १००-१०० गाड्या ठेवलेल्या आहेत स्वतःच्या रस्त्यावर लोक बसतात ना फेरिवाला क्षेत्रामध्ये. तिथेच रिक्षा चालते. तिथेच आमचे नागरीक पायी चालत असतात. स्टेशनला जाताना मार्ग आहे तो. आणि त्या रस्त्यांमध्ये हातगाड्या काय प्रमाण आहे?

**राजेश वेतोसकर :-**

ह्याच उत्तर कोण देणार आहे का?

**प्रशांत दळवी :-**

आणि मी प्रुव्ह करतो. पुढच्या मिटींगला कोणाच्या किती गाड्या आहे ते.

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

बाजार वाढीव वसूलीसाठी जो करार केला आहे आणि जे ठेकेदार नियुक्त केले आहेत. याबाबत ते त्यांचे कार्यक्षेत्र ओलांडून किंवा त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर ते बाजार भाडे वसूली करतात. त्याबाबत माझ ही ज्यावेळेस तक्रार निदर्शनास आल्या त्यावेळेस मा. आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणून कर निरिक्षक म्हणजे आमच्या कर विभागाचे त्यांच्याकडून ही ठेक्याची नियुक्ती केलेली आहे. त्यांना लेखी ऑर्डर काढलेली आहे की, जे बाजार भाडे वसुलीसाठी जो ठेकेदार नेमलेला आहे. त्या करारनाम्यातील अटीशर्ती नुसार ते जर पालन करीत नसतील तर जे त्याच उल्लंघन करतील त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे किंवा कारवाई करण्यात यावी. आता आपण जे सांगितलेल आहे. फिडबॅक आहे. जी माहिती आहे. त्याच्या आधारे त्यांना पुन्हा लेखी सूचना देतो आणि त्याच्याबद्दल कारवाई करण्यासाठी सांगतो.

**शरद पाटील :-**

साहेब हा विषय तुम्ही आता बोलता पण हा विषय आजपर्यंत चालत आलेला आहे ना. प्रत्येकवेळी हेच बोलणार का उद्याच्या नंतर कारवाई करणार. आजपर्यंत कारवाई का नाही केली ते सांगा ना.

**प्रविण पाटील :-**

साहेब, कार्यक्षेत्राच तर उल्लंघन करतातच पण जे १० रु. १५ रु. असेल ना. त्यांच्याकडून डबल रु. घेतात. त्यांच्यावर पण कारवाई करा.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील साहेबांनी बोलले ठिक आहे ते काय जास्त घेतात ते पावतीने घेत नाही. ते वरचे देतात करतात ठिक आहे विषय पण आपल्या नियमात आपल्या ॲग्रीमेंटमध्ये स्पष्ट दिलेल आहे. ना फेरिवाला क्षेत्रामधुन फेरिवाल्याने पैसे वसुल करायचे नाही. याची तक्रार आम्हाला तुम्हाला करायची गरजच नाही. आम्ही तक्रार करुन ही तुम्ही करत नाही. मग ह्याची तक्रार आम्हाला करायची गरज नाही. बोलायची पण गरज नाही. नियमात आहे ते तुम्ही करायला पाहिजे ते का करत नाही? ह्याचे आम्हाला उत्तर द्या.

**संदिप पाटील :-**

साहेब, संबंधीत ठेकेदार आहेत त्यांना तुम्ही ब्लॅक लिस्टमध्ये करा ना.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही आता बोलले की, त्याच्यावर कारवाई करु. ह्यापूर्वी कारवाई केलेली का? ठेकेदाराला नोटिस वैगेरे दिलेली का?

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

कारवाई करण्यासाठी लेखी सुचना दिलेली आहे.

**शरद पाटील :-**

मग त्यांनी केली का कारवाई?

**प्रविण पाटील :-**

ठेका देऊन किती दिवस झाले. तुम्ही त्याला किती वेळा नोटिस दिली? त्याचा आता ठेका संपेल.

**संदिप पाटील :-**

साहेब, भाईंदर वेस्टचा ठेका आहे त्याची मुदत संपलेली आहे का की, अस्तित्वात आहे?

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

नाही सांगता येणार. कर निरिक्षक आणि संकलक पाहतात. त्यांच्याकडून ती सविस्तर माहिती घेऊन सांगतो.

**संदिप पाटील :-**

त्यांना बोलवा. माझ्या माहितीप्रमाणे त्यांचा ठेका संपलेला आहे. अजूनही ते वसूल करतात. मग, त्यांनी मुदतवाढ घेतलेली आहे का?

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

दिपक सावंत हे कमिशनर साहेबांबरोबर गेले. म्हणून ते सांगता येत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मा. उपायुक्त साहेब, आपली जी चर्चा चालू आहे. अतिक्रमणवर कारवाई केली का? होत नाही का? धंदे किती आला? कितीचा नाही केला. हा प्रश्न मला तरी वाटतो की जे ना फेरिवाला क्षेत्र आहे तिथे फेरिवाला बसूच नये. आणि जरी तुम्ही कारवाई करता पुन्हा ती लोक बसतात का? त्याच्यावर आपण काहीतरी करु. मला तरी वाटते स्थायी समितीने ठोस हे करुन बसलेच नाही पाहिजे. त्यांचे सामानच रद्द करा. जे-जे धंदे व्यवसाय करतात. जुन्या गाड्या टाकल्या भंगारमध्ये भंगारवाले आहेत किंवा हातगाड्या आहेत. ते सगळ सामान उचलून कडक कारवाई करा. नाहीतरी मला वाटते की, अशी कारवाई करतात तिथे चिरीमिरी घेऊन पुन्हा चालू करता. असाच प्रकार दिसतो तो. काहीतरी ठोस कारवाई करा. पुन्हा त्या गल्लीमध्ये कोणच नाही बसल पाहिजे. प्रत्येक मिटींगमध्ये हाच विषय येतो.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी आज १६ वर्ष झाले नगरसेवक आहे. आणि १६ वर्षापासून आम्ही हा विषय मांडतो. आणि १६ वर्षापासून विषय मांडत असताना कुठेच कारवाई होत नाही. प्रत्येक वेळेला असच सोडायच असच बोलायच असेल तर आम्हाला सांगून टाका. ह्याच्यावर काही कारवाई होणार नाही तुम्ही ह्याच्यावर बोलायच नाही. आम्ही बोलणार पण नाही. आम्ही कशाला कोणाबरोबर फुकटचा वाद घालायचा काय घेण देण आहे का? आता आमचे बर्नड साहेब बोलले. त्यांचा शब्द बरोबर आहे. चिरी मिरी घेऊन करतात का? १६ वर्ष झाले नाही. चिरीमिरी पण येत नाही बिरीमिरी पण येत पण ते कामच होत नाही.

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

त्यांच्याशी मी निश्चित पूर्णपणे सहमत आहे. ती जी कार्यवाही परिणाम कारक १०० टक्के होत नाही.

**शरद पाटील :-**

१६ वर्ष झाले मी बी.पी रोडची तक्रार करतो.

**विलास ढगे (उपायुक्त (मु)) :-**

मा. सभापती साहेबांच्या सुचनेवरुन मी निवेदन करतो. पहिली गोष्ट फेरिवाला आणि रस्त्यावरीलचे अल्प कालावधीसाठी किंवा दिर्घ कालावधीशी होणारी हंगामी अतिक्रमण सोडून हा अतिशय संवेदनशील विषय आहे. निरंतर विषय आहे, न संपणारा विषय आहे. आपणाला ही परिचित आहे. आपण एका वाक्यात बोलले आपण १६ वर्षापासून प्रयत्नात आहे. यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी दिलेल्या सूचना आणि हे जे आपल पथक आहे त्याच नियोजन करुन मी त्यांच्या प्रभाग अधिकारी आणि पथकांचा तीन वेळा मिटींग घेऊन त्यांना काही सूचना आम्ही लेखी स्वरुपात दिलेल्या आहेत.

**बर्नड डिमेलो :-**

उपायुक्त साहेब, तुम्हाला सांगतो त्या पथकासोबत तुम्ही निघा. ढगामध्ये जसा कडकडाट होतो तसा कडकडाट दाखवला पाहिजे की साहेब आले आणि इथे गल्ल्या साफ झाल्या पाहिजे. कडकडाट येऊन वीज पडेल. अशा प्रकारचा काहीतरी तुम्ही पथक काढा. हादरा बसला पाहिजे.

**शरद पाटील :-**

ढगे साहेब, एक गोष्ट लक्षात ठेवा. हा विषय आज मी ह्याच्यासाठी एवढ्या कडकडीने मांडतो की, मला एक दुकानवाला बोलून गेला. साहब आप हम लोगो के लिए क्या करते हो? त्या ठेकेदाराने त्याच्याकडून ४० रु. मागितले. त्याने ५०० रु. ची नोट दिली तो ठेकेदाराचा माणूस सांगतो ५०० रु. छुट्टा लेके आओ। किधर से भी ४० रु. लेकर आओ। त्याने त्याच्या कानाखाली मारली. ५०० रु. आहेत. तर सुट्टे नसतील तर तुम्ही आणा ना. दुकानवाला नाही आणु शकत. आणि तो दुकानवाला मला येऊन सांगतो साहब आप हमारे लिए क्या करते

है? हम तो पैसा भी देते है और मार भी खाते है। आणि आपल ना फेरिवाला क्षेत्र असून वसूल करायचा अधिकार नाही. ते तिथे मारतात, पैसे वसूल करतात, दादागिरी करतात. ह्याचा अर्थ काय? ह्याच्यासाठी हा विषय मांडला. मी आता एवढे दिवस सोडून दिल होत. कारण आपल प्रशासन ....................

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी काय सांगतो चर्चा फार झाली. आता तुम्ही कधी कारवाई करणार आणि आम्हाला कधी पर्यंत सांगणार तेवढ सांगा. आता तुम्ही निवेदन दिले का कारवाई करणार मिटींग घेणार. तुम्ही फक्त आम्हाला वेळ सांगा की, पुढच्या मिटींग नंतर किंवा दोन मिटींग नंतर त्यांच्यावर कारवाई केली किंवा काय पण कधी करणार त्याचा टाईम टेबल द्या ना. पुढच्या मिटींगला त्याचा अहवाल आम्हाला द्या.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अस करा की, आजपासून तुम्ही जी कारवाई कराल. तुम्ही आता निर्देश द्यायचे ते देऊ शकता. किंवा दुपारनंतर जी कारवाई होईल. त्यानंतर जी मिटींग लागेल तर आपल्या अजेंडावर तो विषय राहील. उपायुक्त मुख्यालय जे इथे बसले आहेत. सगळ्या सभागृहाची जी भावना आहे. त्याच्यावर केलेल्या कारवाई बद्दल निवेदन करायच. पुढच्या मिटींगमध्ये तो विषयच आहे. तुम्ही निवेदन करायच. मग ते ५ मिनिटाच करायच की १५ मिनिटाच करायच. मग आपल्या सभेच कामकाज सुरु होणार.

**शरद पाटील :-**

उद्यापासून ना फेरिवाला क्षेत्रामध्ये ठेकेदाराने पैसे वसूल केले नाही पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जशी यंत्रणा लावायची तशी लावा. गाड्या कशा उचलायच्या त्या उचला. कोणाला प्रशिक्षण द्यायच तर प्रशिक्षण द्या. काय करायच ते करा. पण कारवाई केलेल्याचा अहवाल द्या. आमची अशी अपेक्षा आहे. तुम्ही केलेल्या कारवाई वर आमच समाधानकारक व्हायला पाहिजे. आमच्या पेक्षा या शहरात राहिलेल्या नागरिकांच समाधान व्हायला पाहिजे. म्हणजे की महापालिकेने काहीतरी कारवाई केली. आपल्याला एका व्यक्तीच ह्याच्यामध्ये काही तक्रार नाही. आणि एका कुठल्या व्यक्तिला खुश करायच पण नाही.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, पिछली तीसरी या चौथी स्टँडींग कमिटी थी। उसमें खांबीत साहब ने आश्वासन दिया था की, ईस्ट में नवघर रोड में, फाटक रोड पे डिवाईडर बनाया है। वह गलत थे डिवाईडर बनाया है। वह गलत थे उसमें पत्थर पडे है। उसमें हम कारवाई करेंगे सही करेंगे कुछ कारवाई हुआ नहीं अभीतक। और जो उनका कारवाई का खुलासा हुआ वह बताया मैंने। पत्थर उतने बिखरे पडे थे उधर की ॲक्सीडंट का चान्स है। स्थायी समिती है। स्थायी समिती की कुछ ताकद है या नहीं। यहाँ पर दिया गया अधिकारी का बयान। मा. सभापती साहब, अपनी समिती की आपको ताकद रखनी है या उसको और बढाना है। तीन मिटींग पहले बयान दिया था की, डिवाईडर को ठिक कर देंगे। उसमें क्या किया है अभी ते मालूम नहीं है। और पत्थर इतने पडे थे उसको अभीतक क्लिअर नहीं किया है। हटाने का काम नही किया है।

**राजेश वेतोसकर :-**

डिवाईडर ठिक नहीं करना है, डिवाईडर निकालना है।

**प्रविण पाटील :-**

डॉ. साहेब बोलतात ते बरोबर बोलतात. हा विषय तिसऱ्या मिटींगमध्ये झाला होता. आणि त्यावेळी रुलिंग दिल होत की, आम्ही डिवाईडर काढू म्हणून.................

**मा. सभापती :-**

साहब उसके उपर खुलासा करेंगे। अगर नगरपालिका का कचरा है तो ..........................

**राजेंद्र जैन :-**

हम भी तो खुलासा ही मांग रहे है। और कुछ थोडी ही मांग रहे है।

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, डॉ. जैन साहेबांनी सांगितल होत की, डिवाईडर वैगेरे व्यवस्थित करा. खराब आहेत. यावर मागच्या दोन महासभेत चर्चा झाली आणि सगळ्या सदस्यांनी त्या रस्त्यावर डिवाईडरमुळे जी वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे ते डिवाईडर काढून टाकायला सांगितल आणि तसे मा. महापौरांनी निर्देश दिलेत. त्यानुसार आयुक्तांनी मला कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तर ते सगळे डिवाईडर काढून दुसरीकडे वापरण्यात येईल. आणि तिकडे डांबरीकरण करुन घेतो.

**प्रविण पाटील :-**

काढल पण नाही ना.

**राजेंद्र जैन :-**

कब तक करेंगे। अभी भी रोड पे जाओ साईड पे इतने पत्थर पडे है इतना तो दिमाख में होना चाहिए की साईड में रखेंगे।

**मा. सभापती :-**

साहब नियम होगा तो नियम से करेंगे।

**राजेंद्र जैन :-**

नियम की बात नहीं है। कॉमनसेन्स की बात है। लेबर लगाके २०० रु. देके हटा सकते है।

**मा. सभापती :-**

आठ दिन के अंदर साफ कर देंगे।

**राजेंद्र जैन :-**

साहब एक महिने पहले बोला था आठ दिन में काम करेंगे।

**शरद पाटील :-**

खांबित साहेब, माझी एक सूचना आहे. मेन रोडवर स्पिड ब्रेकर टाकून देत नाही ते आपल्याला माहित आहे. पण ज्या गल्ली बोळ्यामध्ये जर आपल्याला टाकता आले कारण मोटर सायकलचा इतका त्रास आहे ना. गल्लीतुन जेव्हा पोरगा निघतो किंवा बिल्डींग मधून निघतो. असे कुठे स्पॉट आले तर तिथे जरा स्पिड ब्रेकर बनवा अशी माझी सुचना आहे. होत असेल तर चांगल आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब काय आहे की, मागच्या दोन वर्षात आपण कुठेच स्पीड ब्रेकर टाकले नाही.

**शरद पाटील :-**

म्हणून मी आज बोलतो. सुचना ह्यासाठी मांडतो की ह्याची विनंती करतो.

**दिपक खांबित :-**

तुम्ही मागच्या स्टँडिंगमध्ये सर्वांनी विनंती केली होती. त्याप्रमाणे आम्ही मा. आयुक्त साहेबांकडे फाईल पुटअप केली. आयुक्त साहेबांनी सांगितल तुम्ही सर्वे करा. नगरसेवकांनी जे पत्र दिले किंवा त्यांच्या ज्या काही मागणी आहेत त्याप्रमाणे सर्वे करा. आणि जे अत्यावश्यक असतील त्यांना मी मंजूरी देईन असे साहेबांनी सांगितल.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती महोदय, आपल्याकडे इथे इन्फोटेकच सगळीकडे काम चालू आहे. आणि आता जवळ-जवळ पूर्ण शहरात ८०० चेंम्बर बनवतात. म्हणजे एम.टी.एन.एल. च चेंम्बर आहे. तुमचे रिलायन्सचे बॉक्स आहेत. वर्ष झाल. त्यांना आपण दिल आहे. सेव्हरेजच चेंम्बर आहे. अशी सगळी वेगवेगळी चेंम्बर आहेत. आता इन्फोटेक वाले पण सगळीकडे चेंम्बर बनवतात. मी पत्र दिल होत काम बंद करायच. आपल्या रस्त्यामध्ये एखादी बाहेरची कंपनी येऊन सगळीकडे चेंम्बर्स बनवते. माझ्या मते धोरणात्मक विषय आहे. त्यांना परवानगी द्यायची की नाही? आणि आपण त्यांना परवानगी दिली आहे अस पण नाही. जी.आर. मध्ये पण नाही. चेंम्बर बनवली पाहिजे म्हणून. सगळीकडे चेंम्बर बनवत चालली आहे तर ही काम बंद झाली पाहिजे. तुम्ही आदेश द्या. त्यांच काम आता बंद झाल पाहिजे. सविस्तर त्याची परवानगी घ्यावी आणि मगच त्यांनी काम चालू कराव. रितसर परवानगी घ्यावी.

**दिपक खांबित :-**

या कंपनीला रितसर परवानगी दिलेली आहे. शासकीय नुसार आवश्यक रक्कम भरुन घेऊन रितसर परमिशन दिले आणि त्याप्रमाणे त्यांच काम चालू आहे.

**प्रमोद सामंत :-**

रितसर परवानगी केबल लेनची दिलेली आहे. चेंम्बर बनवायची कुठे परवानगी आहे. ती मला दिसलेली नाही. शासनाचा निर्णय पण नाही की, चेंम्बर बनवायला द्यायच ते.

**दिपक खांबित :-**

तो पण केबलचा भाग आहे ना.

**प्रमोद सामंत :-**

केबलचा भाग चेंम्बर कसा असू शकेल? आमच्या रस्त्यामध्ये येऊन ते लोक होल करणार कायमचा वर्षानुवर्षे तिथे झाकत राहत नाही. आता सध्या त्यांच काम बंद करायला पाहिजे. त्यांना रितसर परवानगी द्यावी दाखवावी. आणि मगच काम चालू कराव. ते सगळ काम बंद झाल पाहिजे. साहेब काय असेल तर आम्हाला दाखवाव की, त्यांना आपण चेंबर बनवायची परवानगी दिली आहे तर आणि दिली आहे तर कशी दिली आहे ते पण पाहिजे.

**दिपक खांबित :-**

चेंम्बर हा केबलचाच भाग आहे.

**प्रमोद सामंत :-**

केबलचा भाग नाही. आणि १००-१०० मीटर, ८० मीटर वर त्यांच चेंम्बर आहे. ८०० चेंम्बर ते लोक बनवणार

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

साहेब, मी तुम्हाला उत्तर देतो. त्यांनी जे पत्र दिल दोन दिवसांपूर्वी त्यावर मी फाईल पूट अप करतो. साहेबांची मंजूरी घेऊन आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. आणि त्या कंपनीच्या लोकांना सुध्दा आम्ही

बोलवल आहे. तुम्हाला मागे बोललो होतो की, सोमवारी येणार. पण ते सोमवारी येऊ शकले नाही. त्यांना ह्या सोमवारी पुन्हा बोलवल आहे. त्यावेळेला तुम्हाला बोलवू आयुक्त साहेबांसमोर चर्चा करु. आणि जो काही निर्णय आहे ते घेऊ.

**प्रमोद सामंत :-**

मला सांगायच अस आहे. आपण त्यांना नोव्हेंबर मध्ये परवानगी दिली. समजा, डिसेंबर मध्ये दिली. चार महिने झाले. चार महिन्यात २ मी. X २ मी. खड्डे तसेच आहे. आता परत महिन्यांपूर्वी खड्डे खोदायला घेतले. आता पर्यंत अस होत की खड्डे बूजवणार आहे. त्यांनी खड्डे खोदून चेंम्बर बनवायला घेतली. मला काय सांगायच आहे. या विषयावर जोपर्यंत स्पष्ट तुमच जे काही जी.आर. मध्ये असेल किंवा त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये असेल आणि आपण परवानगी दिली असेल. तर हे जो पर्यंत आमच्या समोर आणत नाही तो पर्यंत काम बंद करा. आज राईट नाही ती काम बंद झाली पाहिजे.

**दिपक खांबित :-**

साहेब, १० मे पर्यंत आपण त्यांना डेडलाईन दिलेली आहे. त्यानंतर आपण कुठलीही परवानगी देत नाही.

**शरद पाटील :-**

खांबित साहेब त्यांच्या बोलण्यामध्ये पॉईंट आहे. एक गोष्ट लक्षात ठेवा. कुठलीही कंपनी या शहरामधल्या नागरीकांना त्यांची पूर्ण परमिशन घेतल्या शिवाय कुठलही काम करुन देत नाही. तर आता आपण त्यांची दया-मया कशाला करायची?

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये आयुक्तांनी अधिकार दिले आहे. ह्या आयुक्तांनी पण परमिशन दिलेली आहे. विक्रम कुमार साहेब असताना ह्यावर बऱ्याच चर्चा झाल्या, बैठकी झाल्या. प्रेजेन्टेशन झाली. आणि त्यांना असलेल्या अधिकारानुसारच परवानगी दिल्या आहे आणि काम सुरु केल आहे. परंतु प्रत्यक्ष जागेवरती जी कंपनी आपल्या अटीशर्ती नुसार काम करत नाही. त्यामुळे आम्ही त्यांची बरेच वेळा कामे बंद केली. अस नाही की आम्ही काम बंद नाही केली.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आता जे आपले सहकारी नगरसेवक आहेत त्यांनी सुचना मांडली. तुमच्या म्हणण्याप्रमाणे केबल टाकणे हा त्यातलाच भाग झाला. अस तुमच मत आहे. जर ते ॲग्रीमेंट मध्ये किंवा जी.आर मध्ये तुमच तस स्पष्टीकरण नसेल त्याच्यामध्ये तर तुम्हाला काम स्टॉप करायला काय हरकत आहे. आमच्या सदस्यांनी ऑब्जेक्शन घेतलेल आहे. तुम्ही केबल टाकल्याने शहरामध्ये प्रत्येक ठिकाणी होल पाडून जमीन पोकळ करण्याच किंवा धोकादायक भविष्यामधील झाकण तुटतील. ऑब्जेक्शन घेतल तोपर्यंत बंद करा. स्पष्टीकरण द्या आणि कोणत्या प्रकारे काय करता येईल त्याच उत्तर तुम्ही पण दिल आहे आणि त्यांनी पण दिल मग चालू करा.

**दिपक खांबित :-**

साहेब, मिरा भाईंदर मध्ये हे काय फर्स्ट टाईम होत नाही. राज्य शासनाने ऑप्टीकल फायबर टाकल्याबाबत २००१ ला पहिला जी.आर काढला. त्यानंतर संपूर्ण देशभरामध्ये हे काम सुरु आहे. आणि शासनाने कुठल्या-कुठल्या हद्दीमध्ये कोणाला अधिकार आहे ते स्पष्ट केल आहे. आपल्याकडे २००५ पासून परमिशन दिलेल आहे. आणि ह्या सिस्टमनेच चालत आलेल आहे. हा काय आज प्रथमच केला आहे अस नाही आहे. ह्या बाबत नगरसेवक प्रमोद सामंत साहेब कंटीन्यू फॉलो अप करतात आम्ही त्यांच्या प्रत्येक सूचनेचा आदर करतो. ह्याचा काही प्रश्न नाही. सोमवारी आम्ही त्यांना आयुक्तांकडे बोलवल आणि ह्यावर डिसीजन तुमच्या समोर घेऊ शकतो. त्यांची ही बाजू ऐकून घेऊ.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, मी जी.आर. वाचलेले आहेत. शासनाची पत्र पण वाचलेली आहेत. त्यामध्ये त्या चेंम्बरचा कुठेही उल्लेख नाही. तुम्ही दिलेल्या परवानगी मध्ये चेंम्बर्सचा कुठेही उल्लेख नाही. मिरा भाईंदर महापालिका क्षेत्राच्या रस्त्यामध्ये एखादा होल ते पण १००, ८० मीटर वर होल करण हे आपण ठरवू शकत नाही. आयुक्त येऊन ठरवतील असे थोडे होईल. आणि मला वाटते त्यांनी ५०० मीटर वर बनवाव. कशाला ८० मीटरवर?

**राजेश वेतोसकर :-**

त्यांनी केबल टाकल तेव्हाच केल. त्याच्यावरच चेंम्बर बनवायला घेतल आहे ..................

**दिपक खांबित :-**

ह्याच्यापूर्वी एम.टी.एन.एल. ने केल आहे. एम.टी.एन.एल. ला दिल होत. रिलायन्स ने बांधले आहेत. सिव्हरेज स्किम चालू आहे. आपण सोमवारी डिसीजन घेऊ ना. मला ती पावर नाही आहे.

**प्रमोद सामंत :-**

डिसीजन होईपर्यंत दोन दिवस काम बंद करा. तुम्हाला अस वाटल बरोबर आहे. आपण नंतर दोन दिवस वाढवून परवानगी देऊ. पण आता जो पर्यंत निर्णय होत नाही तो पर्यंत काम बंद करा. साहेब, तसे आदेश द्यावे अशी आमची विनंती आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांसमोर खुलासा होईपर्यंत काम बंद करण्यात याव.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९, दि. ०७/०३/२०१३ व दि. ११/०३/२०१३ (दि. ०७/०३/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**बर्नड डिमेलो :-**

दि. ०७/०३/२०१३ व दि. ११/०३/२०१३ (दि. ०७/०३/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०९ :-**

दि. ०७/०३/२०१३ व दि. ११/०३/२०१३ (दि. ०७/०३/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०९ :-**

दि. ०७/०३/२०१३ व दि. ११/०३/२०१३ (दि. ०७/०३/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, तात्पुरत्या स्वरुपात ई-ऑक्शन प्रणाली कार्यन्वीत करणे बाबत.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा विषय तात्पुरत्या स्वरुपात म्हणजे काय ह्याची व्याख्या कळेल का कोण सांगेल आम्हाला? आम्ही त्याला मंजूरी द्यायची. ज्याला पाहिजे ते नाही. आम्हाला त्यातल काही समजत नाही.

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. साहेब, ह्याच्यापूर्वी आपल्याकडे E-Procurement म्हणून कंपनी होती ती ई-टेंडरींगच काम करायची. आपण त्यांना मागे नोटीस देऊन काढून टाकल. आणि नविन सिवन इंडिया म्हणून आहेत त्यांना आपण अपॉईंट केल. मागच्या स्थायी समितीनेच ठराव करुन केल होत. त्याच्यामध्ये कस आहे की, फक्त टेंडरींगच्या वतीने ई-टेंडरींगच्या बाबतीतच हे कॉन्ट्रॅक्ट आहे. त्याच्यामध्ये लिलाव असतो तो लिलाव E-Auction ने होत नाही. जुने E-Procurement बरोबर आपला जो कॉन्ट्रॅक्ट होता. तो आपल्याला लिलाव करायचा असेल तर तो बोली पध्दतीने करावा लागतो. त्यामुळे हे पण ई-प्रणाली होणे आवश्यक आहे म्हणून त्यांचा प्रस्ताव घेतला आहे. ह्याच्यामध्ये आपल्याला काही खर्च नाही. पण मागे आपण जो लिलाव केला ना त्यात पैसा जास्त जातो. आणि त्याने ऑनलाईनच पैसे भरायचे आहे.

**शरद पाटील :-**

लिलावा पूर्तीच ई-प्रणाली वापरायची आहे का आपल्याला?

**दिपक खांबित :-**

हो तेवढच.

**रोहिदास पाटील :-**

ॲडीशनल ना.

**दिपक खांबित :-**

हो ॲडीशनल.

**रोहिदास पाटील :-**

ॲडीशनल करते वेळी ३१ हजार रु. चा प्रश्न आहे. प्र.क्र. १० तात्पुरत्या स्वरुपात ई-ऑक्शन प्रणाली कार्यान्वित करणे. ३१ हजारासाठी तुम्ही विषय आणला. जे १० लाख, १२ लाख रु. हे जे होते ................

**दिपक खांबित :-**

साहेब, ह्याच्यामध्ये आपण सिवन इंडिया कंपनी आहे ना टेंडर न काढता आपण काम देत आहे. आणि टेंडर न काढता सुध्दा काम देणे अधिकार स्थायी समितीला आहे कलमानुसार..................

**रोहिदास पाटील :-**

टेंडर न काढता आयुक्तांना किती रुपये पर्यंतचा अधिकार आहे.

**दिपक खांबित :-**

मा. आयुक्त साहेबांना नाही आहे. मा. स्थायी समितीला आहे.

**रोहिदास पाटील :-**

टेंडर न काढता.

**दिपक खांबित :-**

टेंडर ५० हजार रु. पर्यंतचा आयुक्त साहेबांना अधिकार आहे. दरपत्रक मागवून काम करुन घेण्याचे त्याच्यावरती कंम्पलसरी टेंडर ५० हजाराच्या वरती.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे जे सगळ परचेस होते ते मा. स्थायी समितीच्या मान्यता घेतल्या शिवाय .................

**दिपक खांबित :-**

२५ लाखापर्यंत आयुक्त साहेबांना अधिकार आहे.

**रोहिदास पाटील :-**

२५ लाखाला आहे ३१ लाखाला नाही?

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये टेंडर नाही काढणार ना. टेंडर न काढता १ रु. च जरी काम असेल तरी ते अधिकार स्थायी समितीलाच. म्हणून मी विषय आणला.

**रोहिदास पाटील :-**

आता टेंडर नाही काढायच?

**दिपक खांबित :-**

नाही. डायरेक्ट आपण त्या कंपनीला काम देतो.

**रोहिदास पाटील :-**

३१ हजार रुपये द्यायचे आणि कामाला सुरुवात करायची.

**दिपक खांबित :-**

हो. आपण त्याच्याकडून ॲग्रीमेंट करुन घ्यायच.

**प्रमोद सामंत :-**

ई-प्रॉकरमेंट वाल्यांनी गेल्या वेळेला बाजार लिलाव केलेला तो कसा केलेला?

**दिपक खांबित :-**

साहेब, ते कॉन्ट्रॅक्ट मध्ये देतात तस होत.

**प्रमोद सामंत :-**

आणि आता बाजार लिलावासाठी करणार.

**दिपक खांबित :-**

हो. बाजार लिलावासाठी करणार.

**प्रमोद सामंत :-**

बाकी काही कोणत्या गोष्टीसाठी वापरतो का?

**दिपक खांबित :-**

सगळ्यांसाठी वापरतो.

**प्रमोद सामंत :-**

कशा-कशासाठी वापरतो.

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे पण काही लिलाव वैगेरे होतात. सामानाच ह्याच त्याच तर त्याला वापरतात फक्त लिलावासाठी.

**शरद पाटील :-**

३१ हजार रुपये प्रत्येक वेळेला आपल्याला द्यायला लागतील?

**दिपक खांबित :-**

हो.

**बर्नड डिमेलो :-**

प्लस सर्विस टॅक्स.

**दिपक खांबित :-**

२-१ ईव्हेंट होतात. एखादा आमच्याकडून होतो आणि बाजार लिलाव बाकी काही होत नाही.

**शरद पाटील :-**

तलावाच पण होत असेल ना.

**दिपक खांबित :-**

तलावाच आणि ह्याच हे दोनच ईव्हेंट फक्त होतात.

**प्रमोद सामंत :-**

आपल्या भंगार सामान विकण्याच पण लिलाव होतो ना.

**रोहिदास पाटील :-**

हे सगळ ३१ हजारामध्ये आल की परत ..........................

**दिपक खांबित :-**

आता जो ऑक्शन होईल ना बाजार लिलाव होईल तेव्हा त्याला ३१ हजार रु. द्यायचे.

**शरद पाटील :-**

आपले विभाग किती आहेत?

**दिपक खांबित :-**

सगळ एकच करतो. आणि एकदा तलावाच होत असे दोन होतात.

**बर्नड डिमेलो :-**

खांबित साहेब, १ लाखाच लिलाव असला तरी त्याला ३१ हजार द्यायचे?

**दिपक खांबित :-**

साहेब, एक लाखाचा लिलाव नसतो.

**बर्नड डिमेलो :-**

फॉर एक्झाम्पल टोटल जेवढे ऑक्शन असतात. तर तो कसा काय प्रकार होईल?

**दिपक खांबित :-**

१ लाखाचा लिलाव नसतो.

**बर्नड डिमेलो :-**

तर कमीत कमी कितीचा असतो? सगळ कोटी मध्ये कस काय होईल?

**दिपक खांबित :-**

बाजार लिलाव पाच करोडचा असतो. आणि तलावाचा २०-२५ लाखाचा असतो. हे दोनच विषय आहेत.

**शरद पाटील :-**

मग, आपल्याकडे वर्षातून दोनच लिलाव होतात ना. मग तस मेन्शन करा ना.

**बर्नड डिमेलो :-**

तस नाही जेवढे ऑक्शन होईल ना कोणते पण तेवढे ३१-३१ देतील. २ मार्केट आणि एक तलाव.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण दोनच इव्हेंट करतो.

**शरद पाटील :-**

भंगार लिलाव.

**दिपक खांबित :-**

ते ह्यामध्ये नसते. ते आपण ह्याच्यावर करत नाही.

**शरद पाटील :-**

म्हणजे भंगारचे लिलाव नाही आहे.

**दिपक खांबित :-**

आता आपण ईस्टला ब्रिज बांधलेल आहे. त्याच्या लोखंडाचा लिलाव करायचा आहे.

**बर्नड डिमेलो :-**

खांबित साहेब, तुम्ही तलावचे म्हणता. तलाव एकत्रिक एकच व्यक्ती घेत नाही. समजा, आता एक-एक तलाव गेला तर एक-एक तलावाला ३१ हजाराचा नियम लागु होईल.

**दिपक खांबित :-**

आपण तलावाच एकत्रित करतो. एवढा माझा अनुभव आहे की आपण दोनच लिलाव करतो.

**बर्नड डिमेलो :-**

बाजाराच कुठे एकत्र आहे.

**दिपक खांबित :-**

बाजाराच पण एकत्रीत करतो.

**बर्नड डिमेलो :-**

आपण अलग-अलग देतो ना.

**रोहिदास पाटील :-**

देतो अलग पण लिलाव एकचवेळी होते.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत मे. ई- प्रोक्युअरमेंट टेक्नोलॉजीस लि. यांचेद्वारे तयार करण्यांत ई-टेंडरींग तथा ई-ऑक्शन प्रणाली कार्यान्वित करण्यांत आली होती. ई-टेंडरींग प्रणालीमध्ये वारंवार येणा-या त्रुटीमुळे व ठेकेदार व विभागांच्या तक्रारींमुळे सदर अभिकर्त्यांचे दि. ०१/११/२०१२ रोजीच्या आदेशान्वये करारनामा व कार्यादेश रद्द करण्यांत आला आहे व त्याकरीता मे. सी १ इंडिया यांची e-Tendering Service Provider म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचे मार्फत प्राप्त ई-ऑक्शन प्रणाली प्रस्ताव कार्यान्वित करणेकरीता मा. आयुक्त साो यांनी दि.१९/०२/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदरचा प्रस्ताव खालीलप्रमाणेः-

| Sr. no. | Particulars | Rate |
|---|---|---|
| 1. | e-Auction (Forward/Reverse) | Rs.31,000/- +Service Tax as applicable (per Auction) |

वरीलप्रमाणे ई-ऑक्शन प्रणाली कायमस्वरुपी कार्यान्वित करणेकरीता रीतसर निविदा मागवुन अभिकर्ता नेमणूक करणे व उपरोक्त कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे. सी १ इंडीया यांचेकडून प्राप्त प्रस्तावास महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची ‘‘ड’’ मधील प्रकरण क्र. ५ (२) (२) नुसार निविदा न मागवता संविदा करण्यास ही स्थायी समिती सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आमची सुचना पण घ्या.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १० :-**

तात्पुरत्या स्वरुपात ई-ऑक्शन प्रणाली कार्यन्वीत करणे बाबत.

**ठराव क्र. १० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत मे. ई- प्रोक्युअरमेंट टेक्नोलॉजीस लि. यांचेद्वारे तयार करण्यांत ई-टेंडरींग तथा ई-ऑक्शन प्रणाली कार्यान्वित करण्यांत आली होती. ई-टेंडरींग प्रणालीमध्ये वारंवार येणा-या त्रुटीमुळे व ठेकेदार व विभागांच्या तक्रारींमुळे सदर अभिकर्त्यांचे दि. ०१/११/२०१२ रोजीच्या आदेशान्वये करारनामा व कार्यादेश रद्द करण्यांत आला आहे व त्याकरीता मे. सी १ इंडिया यांची e-Tendering Service Provider म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचे मार्फत प्राप्त ई-ऑक्शन प्रणाली प्रस्ताव कार्यान्वित करणेकरीता मा. आयुक्त साो यांनी दि.१९/०२/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदरचा प्रस्ताव खालीलप्रमाणेः-

| Sr. no. | Particulars | Rate |
|---|---|---|
| 1. | e-Auction (Forward/Reverse) | Rs.31,000/- +Service Tax as applicable (per Auction) |

वरीलप्रमाणे ई-ऑक्शन प्रणाली कायमस्वरुपी कार्यान्वित करणेकरीता रीतसर निविदा मागवुन अभिकर्ता नेमणूक करणे व उपरोक्त कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे. सी १ इंडीया यांचेकडून प्राप्त प्रस्तावास महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची ‘‘ड’’ मधील प्रकरण क्र. ५ (२) (२) नुसार निविदा न मागवता संविदा करण्यास ही स्थायी समिती सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, भाईंदर (पूर्व) एम.आय. उद्योग नगर, बी.पी. रोड पर्यंतच्या नाल्याचे स्लॅबसह पुर्नबांधणी करणेकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**मुन्ना सिंग :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) एम.आय.उद्योग नगर बी.पी.रोड पर्यंतच्या नाल्याच्या स्लॅबसह पुर्नःबांधणी करण्याची आवश्यकता असून सदर काम केल्यास नाल्यातून पाणी उतरणार आहे. सदर कामाकरिता रू. २६,५९,६००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदर कामासाठी सन २०१३-१४ वर्षाच्या

अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च इंडस्ट्रीयल इस्टेट मधील रस्ते/गटारे सुधारणा या निधीतून घेण्यात यावा.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती साहब, एक रिक्वेस्ट है। स्थायी समिती के सामने २० लाख, ५० लाख, ९० लाख के प्रस्ताव आते है और उसका अंदाजपत्रक तयार होता है। अभी कमसे कम महासभा तो डिस्ट्रीब्युट तो नही कर सकते। कमसे-कम अंदाजपत्रक यहाँ से दो कॉपी, तीन कॉपी हर एक को मिले तो कमसे कम इतना ज्ञान तो हो की, क्या काम चल रहा है। कैसा काम है? अंदाजपत्रक कैसा बनाया है। सारा काम उपर बॉम्बे से आता है। और अपून अहवाल मंजूर करते है। तो मेरा रिक्वेस्ट इतना है की, इतना नॉलेज तो होना चाहिए की, कैसे अंदाजपत्रक बनाया उसकी कम्पलेन्ट कर सकते है। अंदाजपत्रक यहाँ पे आना चाहिए।

**बर्नड डिमेलो :-**

मी एक सूचना मांडतो. या माहिती साठीच मी टॅब आणि लॅपटॉपच बोलत होतो. मला सांगा जी काय प्रक्रिया होईल. ती तुम्हाला सांगतो या द्वारे आपण महापालिकेचा सर्व कारभार बघू शकतो. त्यावेळी तुम्ही नकार दिला. आता ठराव करणे प्रत्येकाला माहितीचा अधिकार, ॲग्रीमेंटची कॉपी देते. त्यामुळे कागदाचा आणि महापालिकेचे नुकसान होते.

**राजेंद्र जैन :-**

अभी भी इस्टीमेंट इसपर नहीं आते तो हम कारवाई ले सकते है। अभी भी यह लोड नहीं होता है। वर्क ऑर्डर लोड होता है। इस्टीमेट अभी तक लोड नहीं हो रहा है। वर्क ऑर्डर लोड होता है।

**दिपक खांबित :-**

त्यांच्या फाईली या समिती मध्ये आणल्या जातात. आणि कोणाला बघायच असेल त्यांना दाखवून देऊ. आणतात ना फाईल. प्रत्येक इस्टीमेटची फाईल आणली जाते.

**प्रकरण क्र. ११ :-**

भाईंदर (पूर्व) एम.आय. उद्योग नगर, बी.पी. रोड पर्यंतच्या नाल्याचे स्लॅबसह पुर्नबांधणी करणेकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र ११ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) एम.आय.उद्योग नगर बी.पी.रोड पर्यंतच्या नाल्याच्या स्लॅबसह पुर्नःबांधणी करण्याची आवश्यकता असून सदर काम केल्यास नाल्यातून पाणी उतरणार आहे. सदर कामाकरिता रू. २६,५९,६००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदर कामासाठी सन २०१३-१४ वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च इंडस्ट्रीयल इस्टेट मधील रस्ते/गटारे सुधारणा या निधीतून घेण्यात यावा.

**सुचक :- श्री. मुन्ना सिंग** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठश्राव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राती जळाऊ लाकडे पुरवठा करणेच्या निविदेस मान्यता देणे.

**राजेंद्र जैन :-**

दोष किसका था तो प्लास्टरींग का अभी वह खर्चा लगाया। प्लास्टरींग नहीं करना चाहिए ना। नगरोत्थान योजना के अंदर जहाँपर पानी जाएगा वहाँपर स्लॅब लगाने को बोला था। प्लास्टर करने का जब इरकर साहब आए और उन्होंने बोला नो पोजिशन है। जब अंदर प्लास्टर पानी जाएगा .......................

**दिपक खांबित :-**

वह तो मै आज भी बोलता हूँ। नाले के पटरी या दिवार को प्लास्टर होना चाहिए। यह टेक्नीकल है।

**राजेंद्र जैन :-**

मेरी बात सुनिए आप। अभी इतनी ६ करोड की योजना बनी है। उतनी बडी है उसमें प्लास्टर ही लगेगा। पानी का प्रवाह बडी-बडी चट्टान को चिकना कर देता है। वाय प्लास्टर .................

**दिपक खांबित :-**

प्लास्टर करने की जरुरत नहीं है दिवार को।

**प्रमोद सामंत :-**

इंजिनियरींग टर्म में अगर उसको ऐसा दिखाया है तब यह बतादो। तो प्लास्टरींग कॅन्सल होगा।

**राजेंद्र जैन :-**

अगर यह इतना सही है, तो इन्होंने विक्रम कुमार साहब से आरग्युमेंन्ट क्यों नहीं किया?

**दिपक खांबित :-**

किया था मैंने आरग्युमेंट वह बोले ठिक है। मैं बोलता हूँ करके कॅन्सल करो।

**राजेंद्र जैन :-**

अभी उसमें कुछ नुकसान नहीं हुआ ना काम को।

**प्रमोद सामंत :-**

अभी तक काम पूरा नहीं हुआ।

**राजेंद्र जैन :-**

ठेकेदार ने बोला साहब यह टेक्नीकल का काम है। यह प्लास्टर हम करते ही नहीं। पानी निकलता है।

**प्रमोद सामंत :-**

प्लास्टरींग करते नहीं और पैसा लेते है, तो आप उनको बोलो।

**राजेंद्र जैन :-**

तीन महिने बाद मे यह होने वाला है। पानी अंदर चला जायेगा आपको मालुम भी नही पडेगा प्लास्टर किया है की नही किया। आप जाकर देखनेवाले है वहाँपर इस्टीमेट मालूम नही पडता है कहाँ पे कैसा काम चालू है कैसे मालुम पडेगा। खुल्लम खुल्ला काम चालू है और आप चेक नही करते है।

**प्रमोद सामंत :-**

अगर टेक्नीकल टर्मस् मे प्लास्टर होना नही जरुरी है तो वह कॅन्सल कर सकते है लेकीन टेक्नीकल टर्मस् मे होना जरुरी है तो आप उनको दिखा दो या आप उनको दिखादो जरुरी नही है।

**राजेंद्र जैन :-**

जो टेक्नीकल टर्मस् के पॉईंट्स है ना वह पेपर एज्युकेशन है वह हमे भी बतादो हम भी उसपर स्टडी करेंगे।

**प्रविण पाटील :-**

टर्मस् मध्ये काय लिहिलं ते सांगा ना.

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

टर्मस् कंडीशन मध्ये प्लास्टर घ्यायला पाहिजे (गोंधळ)

**राजेंद्र जैन :-**

जब इन लोगो को अपना काम बटता है तो आपको समझाने के लिए लोग ठाणा का, भिवंडी का, उल्हासनगर, नवी मुंबई का, महानगरपालिका का, उधार देती है। यही काम क्या बाकी नगरपालिकाओ में ऐसे होता है। उसका कंपनी का इस्टॅब्लिशमेंट सावट है क्या जो हम स्टडी कर सके।

**प्रमोद सामंत :-**

आप मांगो देंगे ना।

**राजेंद्र जैन :-**

कितनी बार मांगा, लेटर दिया है।

**प्रमोद सामंत :-**

खांबित साहेब, ने जे मागतात त्यांना तुम्ही प्रोव्हाईड करा ना.

**दिपक खांबित :-**

त्यांना आम्ही जेवढे डॉक्युमेंट देतो ना, त्यांच्या प्रश्नाची उत्तरे देतो तेवढं कोणालाच देत नाही म्हणजे त्यांच्या जेवढ्या सुचना घेतो ना तेवढ्या कोणाच्याच घेत नाही.

**राजेंद्र जैन :-**

इनका आदेश आता है वह मौखिक आदेश आता है। ठेकेदार को मौखिक आदेश दिया अभी काम बंद करो। फिर २ महिने का लिखा हुआ वर्क ऑर्डर बोला १२ बजे लिखा गलती से छप गया उसका वर्क ऑर्डर कॅन्सल किया उसका डेट और आऊट वर्ड नंबर दो तो उन्होंने आऊट वर्ड नंबर मौखिक बोल दिया।

(सभागृहात गोंधळ)

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, डॉक्टरांच बोलण झालेलं आहे. डॉक्टरांनी पैसे वाचवण्यासाठी जरा ठंडा घेतलेला आहे तर मी त्यांचं स्वागतपण करतो प्रश्न असा आहे आता आरसीसी आहे

बांधकाम आहे विटांचा दगडांचा आणि जरी आपण आरसीसी बनवलं ते प्लाय जे मारतात ते बरोबर लेवलवर नसल्याने प्लास्टर नाही केलं तर जागोजागी तिथे पाणी सुरळीत नाही गेलं तर बेकार होईल त्यामुळे प्लास्टर ची आवश्यकता आहे.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

अभी यह कंट्रोल सपोर्ट किया है ना जहाँ पानी अंदर रहनेवाला हमेशा सतत वहाँपर प्लास्टर है नही है। जो भी इनका लिखा पडी है वह हमको दिखा दो।

**मा. सभापती :-**

डॉ, साहब वह काम अगर सही नही होगा तो हम व्हिजीट करेंगे।

**बर्नड डिमेलो :-**

ठराव वाचण्या अगोदर आपण जे स्मशान भुमी मध्ये जळाऊ लाकडं पुरवठा करीत होतो ते केतन इंटरप्रायजेस अगोदर आपल्याला लाकडं पुरवठा करायचा तर त्याने ३ रु. १० पैसे, ५ पैसे चा फरक ठेवला आहे आणि गेल्यावर्षी सुरळीत काम चालू होतं तर त्यांचा ५ पैशाचा फरक आहे तर त्या व्यक्तीला त्यांनी ३ रु. १५ पैसे त्यान जळाऊ लाकडांची क्वालीटी आणि जळाऊ लाकडाचा साठा त्याच्याबद्दल बऱ्याच लोकांच्या तक्रारी होत्या तर गेल्या वेळेला जे आपलं चालू होतं दावडा ने तेच केलेलं आहे त्याने १० पैसे कमी आहे आणि आपला पुरवठा ५ पैशाचा आहे तर त्याच्यावर तुम्ही चर्चा करावी गेल्या वेळेला ५ पैसे बघुन त्याला ठेका दिला त्या लाकडाची क्वालीटी आणि जो स्तर दिला जातो जळाऊ लाकडे तो कुजलेली या प्रकारचा पुरवठा केला तर त्यांनी जरा स्पष्टीकरण करावं.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य बर्नड डिमेलो ज्यांना ३ रु. १५ पैश्याला दिलं होतं त्याच्याबद्दल तक्रार आहे का?

**बर्नड डिमेलो :-**

हा.

**रोहिदास पाटील :-**

मग आता ३ रु. १० पैसे वाला आला आहे ना.

**बर्नड डिमेलो :-**

१० पैसे वाल्यानेच कमी दाखवलं

**रोहिदास पाटील :-**

गेल्यावर्षी कोणाला दिलं होतं दावडा ला ना?

**बर्नड डिमेलो :-**

हो.

**दिपक खांबित :-**

एम. डी. दावडा जे आहेत ते आपल्याकडे दोन वर्षापूर्वी सप्लाय करायचे त्यानंतर आपण परत टेंडर काढल्यावरती केतन इंटरप्राईजेस ला काम दिलं मग त्याच कॉन्ट्रॅक्ट संपल आपण पून्हा काढलं तर पुन्हा दावडा ला काम लागल तर त्यांच म्हणणं आहे की, दावडाला जे पून्हा काम लागल तर त्याच काम बरोबर नाही आहे आणि हा जो आहे केतनवाला ३ रु.१० पैशाने लाकडं पुरवायला तयार आहे असं त्याने पत्र दिलं आहे तर त्यांना काम न देता ह्याला काम द्या असा त्यांचा प्रस्ताव आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हीच आता निवेदन केलं जे रेकॉर्डिंग झालं की, केतन ची लाकडं जूनी होती त्याची तक्रार आहे.

**दिपक खांबित :-**

नाही दावडाचं बोललो मी.

**बर्नड डिमेलो :-**

नाव घेण्यात चुकी झाली प्रश्न असा की, गेल्यावर्षी पुरवठा केतन करायचा आणि जो दावडा आहे त्याने............

**रोहिदास पाटील :-**

कायद्याची बाब म्हणून त्याची ३ रु. १० पैसे आहे त्याचे ३ रु. ८ पैसे करा मग आपण कोणीही कुठे सभापती पण अडचणीत येत नाही उपायुक्त पण अडचणीत येत नाही सचिव पण अडचणीत येत नाही.

**प्रविण पाटील :-**

काका, त्यांनी पत्र दिलेलं आहे १० चं पत्र दिलेलं आहे.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

काका ऐकुन घ्या प्राप्त झालेल्या निविदातील कमी दराचे दरपत्रक परंतु, यांचा पूर्वानुभव विचारात घेता निकृष्ट दर्जेचे लाकडं पुरवठा करत असताना पूर्वानुभव आहे सबब दोन नं चे निविदा धारक या कमी दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने पुरवठा तयार करण्यास असल्यास त्यांची निविदा सब्जेट टू एकतर ३ रु. १० पैसे ला किंवा त्याच्यापेक्षा कमी दराला द्यायला पाहिजे ह्याला आपण वेगळ पत्र द्यावं लागेल की, असा ठराव झालेला

आहे की कमीत कमी या दराची पत्रिका आहे ३ रु.१०पैसे किंवा त्यापेक्षा कमी दराने आपण पुरवठा करायला तयार असल्यास..............

**रोहिदास पाटील :-**

३ रु. १० पैसे नाही ३ रु. १० पेक्षा कमी करायचे.

**संदीप पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझी एक सुचना आहे जी लाकडं पुरवठा करतात आता ती बारीक स्वरुपाची न करता मिडीयम स्वरुपाची आणा किंवा मोठ्या स्वरुपाची आणा कारण बारीक स्वरुपाची आणलं तर हे होतात.

**शरद पाटील :-**

खांबित साहेब त्याची अमाऊंट काय आहे?

**दिपक खांबित :-**

२५ लाख रु. पर्यंत आहे आणि जनरल २ ठिकाणी आपण करत नाही ते लोकच करतात त्यालापण हजार रुपये परत देतो.

**शरद पाटील :-**

आणि जे विकत घेतात त्यांना ते पैसे देत असतील.

**प्रविण पाटील :-**

खांबित साहेब, ह्याच्यामध्ये जे पावती फाडतात ते पैसे कोणाला भेटतात ठेकेदाराला भेटतात की, पालिकेला भेटतात?

**दिपक खांबित :-**

पालिकेला.

**बर्नड डिमेलो :-**

दि. १९/०३/२०१३ रोजी दै.लोकमत व दै. मिड-डे या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| **अ. क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **परीमाण** | **ठेकेदारांनी सादर केलेले दर** | | | **मा. आयुक्त यांची मंजुरी** | **वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक** | **ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. केतन इंटरप्रायझेस | **मे. एम. डी. दावडा** | मे. मीना ट्रेडींग कं. | | | |
| | | | दर | **दर** | दर | | | |
| १ | २ | ३ | ४ | **५** | ६ | ७ | ८ | ९ |
| **१** | **मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभुमीत जळाऊ लाकडे पुरवठा करणे.** | **प्रति कि.ग्रॅम** | रु. ३.१५ पैसे | **रु. ३.१० पैसे** | रु. ३.२० पैसे | दि. १३/०३/२१३ | दै.लोकमत व दै. मिड-डे दि. १९/०३/२०१३ | दि.१८/०३/२०१३ |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदारांनी सादर केलेल्या निविदांपैकी मे. एम.डी. दावडा यांनी सादर केलेली निविदा वाजवी आहे. तथापी निविदा सादर केलेले मे. केतन इंटरप्रायझेस यांचे दर जरी जादा असले तरी त्यांनी मागील सहा महिन्यात पुरवठा केलेल्या लाकडाचा दर्जा हा चांगला होता. मे. एम. डी. दावडा यांनी यापूर्वी महानगरपालिकेच्या स्मशानभुमीत लाकडे पुरवठा केली होती. त्यांच्या लाकडाचा दर्जा चांगला नसल्याचे निदर्शनास आले होते, त्यामुळे त्यांचे दर मंजूर करण्यात येत नाहीत. मे. केतन इंटरप्रायझेस यांनी रु. ३.१०/- प्रति कि.ग्रॅम दराने लाकडे पुरवठा करण्याकरीता पत्र दिले आहे, तथापी मे. केतन इंटरप्रायझेस हे रु. ३.०५/- प्रति कि. ग्रॅम दराने लाकडे पुरवठा करण्यास तयार असल्यास मे. केतन इंटरप्रायझेस यांचे दर मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण पाच (२) (२) अन्वये स्थायी समितीस प्राप्त अधिकारात ही सभा करारनामा व कार्यादेश देण्याकरीता मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे. सदर जळाऊ लाकडे ही मध्यम व मोठया स्वरुपाची पुरवठा करण्यात यावीत. पावसाळयासाठी लागणाऱ्या जळाऊ लाकाडांचा साठा मे अखेर पर्यत करुन ठेवण्यात यावा.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**संदीप पाटील :-**

खांबित साहेब, माझी एक सुचना घ्या लाकडं मिडीयम स्वरुपाची पाहिजे लहान स्वरुपाची नको कारण लहान स्वरुपाची असतात ते जळण्यासाठी व्यवस्थित नाही म्हणून मिडीयम स्वरुपाची पाहिजे.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, माझी पण सुचना आहे जो कोणी ठेकेदार आहे त्याला आपण कडक आदेश दिले पाहिजे की, पावसाळ्यात जेवढी लाकडं लागणार आहे तेवढा स्टॉक त्यांनी केला पाहिजे मग ते स्टॉक करत नाही लाकडं नंतर आणतात बाहेर ट्रक टाकून ठेवतात मग ती ओली होतात त्यांनी पावसाळ्यापूर्वी स्टॉक केला पाहिजे.

**मा. सभापती :-**

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राती जळाऊ लाकडे पुरवठा करणेच्या निविदेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १२ :-**

दि. १९/०३/२०१३ रोजी दै.लोकमत व दै. मिड-डे या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| **अ. क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **परीमाण** | **ठेकेदारांनी सादर केलेले दर** | | | **मा. आयुक्त यांची मंजुरी** | **वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक** | **ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. केतन इंटरप्रायझेस | **मे. एम. डी. दावडा** | मे. मीना ट्रेडींग कं. | | | |
| | | | दर | **दर** | दर | | | |
| १ | २ | ३ | ४ | **५** | ६ | ७ | ८ | ९ |
| **१** | **मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभुमीत जळाऊ लाकडे पुरवठा करणे.** | **प्रति कि.ग्रॅम** | रु. ३.१५ पैसे | **रु. ३.१० पैसे** | रु. ३.२० पैसे | दि. १३/०३/२१३ | दै.लोकमत व दै. मिड-डे दि. १९/०३/२०१३ | दि.१८/०३/२०१३ |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदारांनी सादर केलेल्या निविदांपैकी मे. एम.डी. दावडा यांनी सादर केलेली निविदा वाजवी आहे. तथापी निविदा सादर केलेले मे. केतन इंटरप्रायझेस यांचे दर जरी जादा असले तरी त्यांनी मागील सहा महिन्यात पुरवठा केलेल्या लाकडाचा दर्जा हा चांगला होता. मे. एम. डी. दावडा यांनी यापूर्वी महानगरपालिकेच्या स्मशानभुमीत लाकडे पुरवठा केली होती. त्यांच्या लाकडाचा दर्जा चांगला नसल्याचे निदर्शनास आले होते, त्यामुळे त्यांचे दर मंजूर करण्यात येत नाहीत. मे. केतन इंटरप्रायझेस यांनी रु. ३.१०/- प्रति कि.ग्रॅम दराने लाकडे पुरवठा करण्याकरीता पत्र दिले आहे, तथापी मे. केतन इंटरप्रायझेस हे रु. ३.०५/- प्रति कि. ग्रॅम दराने लाकडे पुरवठा करण्यास तयार असल्यास मे. केतन इंटरप्रायझेस यांचे दर मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण पाच (२) (२) अन्वये स्थायी समितीस प्राप्त अधिकारात ही सभा करारनामा व कार्यादेश देण्याकरीता मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे. सदर जळाऊ लाकडे ही मध्यम व मोठया स्वरुपाची पुरवठा करण्यात यावीत. पावसाळयासाठी लागणा-या जळाऊ लाकाडांचा साठा मे अखेर पर्यत करुन ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

उपरोक्त विषयानुसार महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पुर्व) कनाकिया येथील कनाकिया मेन रोड येथे गॅलेक्सी हॉस्पीटल ते प्रथमेश हेरीटेज, सालासर आँगन हा परिसर नव्याने विकसीत होत आहे. सदर परिसरातील इमारतींना महानगरपालिकेच्या जलजोडण्या आहेत. सदर जलजोडण्या ह्या वितरण जलवाहिनीपासून लांबून आहेत. तसेच महानगरपालिकेची मुख्य वितरण जलवाहिनी कमी व्यासाची असल्याने त्यांना कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. सबब सदर ठिकाणी महानगरपालिकेची वितरण

जलवाहिनी अंथरल्यास सदर परिसरातील पाणी प्रश्न सुटू शकेल. तरी सदर ठिकाणी नविन पाणी वितरण जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) कनाकिया येथील कनाकिया मेन रोड येथे गॅलेक्सी हॉस्पीटल ते प्रथमेश हेरीटेज, सालासर ऑंगन पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.२८,४३,२००/- |

तरी वरील काम करणे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मला एक सांगा सध्या आपल्या इथे नविन पाणी येत नाही आपण नविन कनेक्शन देत नाही तर हे टाकणं जरुरी आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, या ठिकाणी आता जी लाईन आहे ती कमी व्यासाची आहे त्याच्यावर काही ॲग्जेस्टींग कनेक्शन आहे त्याला पाणी कमी दाबाने जाते आता आपण लाईन टाकताना भविष्यातली रिक्वायरमेंट लक्षात घेऊन लाईन टाकली पाहिजे म्हणजे परत परत त्या ठिकाण लाईन टाकता कामा नये म्हणून आता आपण ही लाईन टाकतो काही ठिकाणी ॲग्जेस्टींग कनेक्शन आहे त्याठिकाणी त्याचा फायदा होणार आहे.

**शरद पाटील :-**

तुम्ही जेव्हा तिथे पहिली लाईन टाकली तेव्हा असा विचार केला नाही की, इथे डेव्हलपमेंट होणार आहे.

**सुरेश वाकोडे :-**

आता त्या ठिकाणी नविन डेव्हलपमेंटचा भाग आहे. हा कन्टीन्यु पुढे पुढे चालत चाललेला आहे. ही जी लाईन टाकलेली आहे ती जुनी लाईन आहे.

**शरद पाटील :-**

मला तेच बोलायचे आहे. जेव्हा जुनी लाईन टाकली, तेव्हा तुम्ही तो विचार करायला पाहिजे होता ना. उद्या लगेच तुम्ही लाईन टाकल्यानंतर नविन कनेक्शन चालु करणार नाही ना.

**सुरेश वाकोडे :-**

कनेक्शनच हे नाही. त्याच्यामध्ये कसे आहे की, भविष्याच्या रिक्वायरमेंटप्रमाणे ही लाईन टाकतो. आता त्या ठिकाणी.........

**बर्नड डिमेलो :-**

पाटील साहेबांच्या विषयावर मी बोलतो. कसे आहे की, अन्य राज्यामध्ये, देशामध्ये बघा तुम्ही. जरी एक कुटूंब कोणत्या गावात राहते आणि ते समजा १० कि.मी. मध्ये एकच कुटूंब आणि एकच घर आहे, तिथे जर टेलिफोनची लाईन असेल किंवा नळाचे कनेक्शन असो तर ते एका घराचचं नियोजन करुन ती लाईन टाकतो असं भारतामध्ये जास्त चाललं आहे. जमिन आहे, रहदारी रस्ता केलेला आहे तर तिथे लोकसंख्या वाढणार ह्या अनुषंगाने आपले इंजिनिअर काय बोलतात की, तिथे कनेक्शन अगोदरच टाकायला पाहिजे तर ग्राम पंचायत ची नगरपालिका, नगरपालिकेची महानगरपालिका होते तर त्या अनुषंगाने ग्रामपंचायतच ठिक आहे खेडेगावासाठी केलं आहे पण आता महानगरपालिका आपली काम करताना त्या योजना डोक्यात घ्यायला पाहिजे की नको नाहीतर वारंवार लाईनी अंथरण्यामध्ये त्या पैशाचा हे करायचा आपण शहराचा सुंदरीकरण करायच आहे चांगल्या प्रकारे शहर आपल्याला सुंदर बनवायचं आहे ते जलवाहीन्या टाकण्यामध्येच पैसा जातो तर त्या योजनेच काही प्लांनिंग आहे की नाही? की, फक्त आम्ही मंजुऱ्या द्यायच्या.

**शरद पाटील :-**

वाकोडे साहेब, आमचे गटनेते बरोबर बोलले आहेत. त्यांच म्हणन बरोबर आहे. आता तुम्ही जी मंजुरी घेतली आहे. ती पुढच्या भविष्यात पूर्ण होईल का? की, परत नंतर कुठेतरी वाढल की, तुम्ही सांगाल अजून वाढवून पाहिजे. ते कस काय करायच त्याच?

**सुरेश वाकोडे :-**

साहेब त्या रोडची भविष्यातली सगळी requirement consider करूनच लाईन टाकतो.

**शरद पाटील :-**

ह्याच्यात काही बदल होणार नाही. आता तुम्ही मला एका प्रश्नाच उत्तर द्या. ती जूनी पाईप लाईन आहे ती तुम्ही काढणार की तशीच ठेवणार ? ही टाकल्यानंतर..........

**सुरेश वाकोडे :-**

जुनी पाईप लाईन सेम ठेवणार ती फक्त त्याला काय करणार की नविन लाईन क्रॉस कनेक्शन करणार. आणि त्याला लिमिटेड ठेवणार. म्हणजे जूनी लाईन १५-२० कनेक्शनसाठी मर्यादित ठेवणार. आता जी लाईन आहे ती ४० कनेक्शनसाठी असल्यामूळे तो प्रॉब्लेम होतो.

**शरद पाटील :-**

कस असत नंतर काय होत मग तुम्हीच एखादा आदेश काढता आणि तुम्हाला प्रेशर कमी येतो तुम्ही नविन लाईनवर कनेक्शन घ्या कारण अस प्रत्येक वेळेला होत चाललेल आहे.

**प्रशांत दळवी :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील बोलले ते बरोबर आहें. मी सुध्दा ह्याच विषयावर बोलतो. साहेब तुम्हाला माहित असेल गेले १० दिवस मिरारोड प्रभाग क्र. ३८ मध्ये सेक्टर चारमध्ये पाण्याची काय परिस्थिती आहे? मा. सभापती साहेब आज मी तुम्हाला सांगतो तिकडे इंटरनल नविन पाईपलाईन टाकलेली आहे. जूनी बिल्डरची अगोदर गटारामध्ये पाईप लाईन होती. त्यावर सगळयांचे कनेक्शन होते. आपण सगळया सोसायट्यांना पत्र दिलेली आहेत. की ५०० रू. भरायचे आणि त्या नविन लाईन म्हणून द्यायच. पण लोकांची काय समजूत काढणार? त्यांना तुम्ही कशाप्रकारे नोटिस दिली आहे. म्हणजे तुम्ही जे काही पैसे भरायला लावले आहेत लोक म्हणतात ५०० रू. भरून आले आहेत. त्यांच्याकडे पावती आहे. पण पुढच काय? कनेक्शन देणार कोण?

**सुरेश वाकोडे :-**

जुनी लाईन जेव्हा बंद करायची असते त्यावेळेला आपण काय करतो की ५०० रू. भरून पावती फाडून घेतो. आणि त्या ठिकाणी खड्डा मारून बोरिंग मारतो. पण त्या बोरिंगपासूनच पाईप वैगेरे ...........................

**प्रशांत दळवी :-**

अहो पण सोसायटीला सांगणार कोण? त्या मताशी मी सहमत आहे. तुम्ही त्यांच्याकडून घ्या. जो काही खर्च असेल तो घ्यायचा प्रॉब्लेम काय झाला की जूनी पण लाईन चालू ठेवली आणि नविन पण चालू ठेवली. त्यामूळे प्रॉब्लेम असा झाला की ४-५ बिल्डींगला पाणी व्यवस्थित भेटत होत. प्रेशरने म्हणून त्यांनी नविन लाईन मधून घेतलेल आहे. त्यांनी ५०० रू. भरलेले आहे म्हणून तर घेतलेल आहे. आज प्रॉब्लेम असा क्रिएट झाला की, जूनी लाईन फुटली आणि त्याचा पॉईन्ट आपल्या कर्मचाऱ्याला मिळत नाही. कुठे फुटली म्हणून. त्यामूळे ४ दिवस अगोदर जूनी लाईन बंद करून टाकली. त्याला पॉईन्ट भेटत नाही म्हणून पाणी वाया जाते. साहेब पाणी वाया जाते पॉईन्ट भेटत नाही. परंतु ४-५ बिल्डींगला पाणी भेटले नाही ना. तितक्यावरच थांबल नाही तर आपली एक टाकीला बाहेरून लाईन आहे ती लाईन आपण जुनीच वापरतो. बिल्डर ने जी टाकलेली आहे तीच वापरतो. आपण तिकडे नविन लाईन दिलेली नाही. ती लाईन ६ फुट खाली आहे. आज त्या बिल्डींग च्या एवढ्या कम्पलेन्ट आलेल्या आहेत. आम्ही त्या अधिकाऱ्यांना फोन करतो, अधिकारी कर्मचाऱ्याला फोन करतो, कर्मचारी म्हणतो बिल्डींगचे वॉल चेंज करा अहो पण पाणीच भरत नाही तर वॉल काय चेक करणार. तुमच्या माहितीसाठी साहेब मी हे तुम्हाला सांगतो. आज अशी परिस्थिती होती जो त्या A type ला वॉल जातो. म्हणजे तुम्ही जो वॉल खोलता. त्या बिल्डींगचे वॉल नाही. तुम्ही जो वॉल खोलता, तो वॉल अर्धवट खोलला जातो. मग तो वॉल तुटला होता अस निदर्षनास आल. आणि त्यामुळे २ दिवसापासून प्रेशर बंद आहे. आणि सकाळी त्यांना प्रेशर ने पाणी देणार. दोन दिवसापासून तिकडे पाणी नाही. मा. सभापती महोदय हा ज्वलंत प्रश्न आहे. आणि माझी एक विनंती आहे की, वाकोडे साहेब तुम्ही त्या तिकडे पाण्याच्या पाईप लाईनचा विषय घ्या. कारण ती जूनी लाईन आहे आणि कन्फम तरी करा सगळयांना. कारण आपण फक्त नोटिस देतो ५०० रू. भरा आणि ते भरून मोकळे होतात .

**मा. सभापती :-**

तातडीने कारवाई करा.

**संदिप पाटील :-**

मा. सभापती महोदय, आज दोन दिवस झाले भाईदर स्मशान भूमीच्या समोर पाईप लाईन फुटलेली आहे. त्याला दोन महिने झाले. त्याच अजून पर्यत काम झालेल नाही. ज्या स्मशान पर्यत जे लोक घेऊन येतात प्रेत यात्रा संपूर्ण प्रेत यात्रेची लोक पाण्यामध्ये असतात. आज पण जाऊन बघा तिथे पाणी किती साठलेल आहे. २ महिने झाले त्या गोष्टीच पत्र लिहून अजून तिथे काम झालेल नाही पाईप लाईनच.

**सुरेश वाकोडे :-**

आम्ही त्या ठिकाणी चेक केलेल आहे तिथे पाईप लाईनच लिकेज नाही आहे. ते नाल्यातून पाणी येते. त्याला आम्ही चेक पण केल.

**संदिप पाटील :-**

सिव्हरेजची लाईन जेंव्हा चालू होती तेव्हा पाईप लाईन डॅमेज झालेली आहे.

**सुरेश वाकोडे :-**

त्याठिकाणी पाईप लाईन चेक केल आहे.

**रोहिदास पाटील :-**

कोणता असा नाला आहे की रस्त्याच्यावर पाणी येईल.

**संदिप पाटील :-**

जिथे पाणी आहे तिथे नालाच नाही आहे.

**सुरेश वाकोडे :-**

परत एकदा मी चेक करून घेतो. आणि दळवी साहेबांनी जे सांगितल त्याप्रमाणे तीन सोसायटींना नविन लाईन व्यवस्थित करून घेवू या.

**शरद पाटील :-**

मी त्या विषयाबद्दल बोलतो, आपला क्लियर कट ठराव येतो. आणि ठराव आम्ही मांडला होता. ज्यावेळेला जी महापालिका लाईन बंद करेन त्यांना ५०० रू. देऊन नविन ह्याच्यावर शिफ्टींग करायच. पण त्यावेळेला शिफ्टींग करताना तुम्हाला ही खबरदारी बाळगायची आहे की, सगळ्याच्या सगळी कनेक्शन ही शिफ्टींग झाली पाहिजे. आणि ते आपण करत नाही. आणि ते करत नसल्यामुळे तो प्रॉब्लेम झाला आहे. तुम्ही त्यांना कंम्पलसरी ५०० रु. भरल्यानंतर त्यांना सांगायच की, आम्ही १५ दिवसानंतर लाईन बंद करणार आहोत. तुम्ही इथे ५०० रु. भरुन शिफ्टींग करायला पाहिजे. तरच ते होईल. कारण हा प्रॉब्लेम पहिला पण झालेला आहे. त्याच्यामुळे चार कनेक्शन तिथे राहतात. आणि त्या चार कनेक्शनसाठी तुमच्याकडे येऊन भांडायला लागत.

**प्रविण पाटील :-**

हाच प्रॉब्लेम जैन नगरला पण झालेला आहे. दोन पाईप लाईन आहेत तिकडे जूनी पण नविन पण. जूनी काही घेतली नाही. ह्यांनी सांगितल त्याचप्रमाणे स्थिती आहे. ह्यांनी सांगितलेला ठरावा प्रमाणे केले नाही तर तसेच राहणार.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १३ :-**

उपरोक्त विषयानुसार महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पुर्व) कनाकिया येथील कनाकिया मेन रोड येथे गॅलेक्सी हॉस्पीटल ते प्रथमेश हेरीटेज, सालासर आँगन हा परिसर नव्याने विकसीत होत आहे. सदर परिसरातील इमारतींना महानगरपालिकेच्या जलजोडण्या आहेत. सदर जलजोडण्या ह्या वितरण जलवाहिनीपासून लांबून आहेत. तसेच महानगरपालिकेची मुख्य वितरण जलवाहिनी कमी व्यासाची असल्याने त्यांना कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. सबब सदर ठिकाणी महानगरपालिकेची वितरण जलवाहिनी अंथरल्यास सदर परिसरातील पाणी प्रश्न सुटू शकेल. तरी सदर ठिकाणी नविन पाणी वितरण जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) कनाकिया येथील कनाकिया मेन रोड येथे गॅलेक्सी हॉस्पीटल ते प्रथमेश हेरीटेज, सालासर आँगन पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.२८,४३,२००/- |

तरी वरील काम करणे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (आरोग्य विभाग) प्रकरण क्र. १५, मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (संगणक विभाग), प्रकरण क्र. १६, मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (पाणी पुरवठा विभाग), प्रकरण क्र. १७, मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे (भांडार विभाग) - लेखन सामुग्री (स्टेशनरी) खरेदी करणे.

**मा. सभापती :-**

अवलोकन सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, माझ्या वॉर्डमध्ये उद्यान आहे. यशवंतराव चव्हाण उद्यान मी गेले महिनाभर मागे लागलो. सुरक्षा रक्षक तिकडे जास्त पुरवावी. कारण आता सुट्टी आहे. दिड ते दोन हजार लोक संध्याकाळी तिकडे असतात. मी ढगे साहेबांना फोन केला. परब साहेबांच्या मागे कमीत कमी दिड महिना लागलो पण अजून सुरक्षा रक्षक देत नाही.

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

काल तुमचा फोन आला होता. मी तुम्हाला सविस्तर सगळ सांगितलेल आहे. सुरक्षा रक्षक कोण उपलब्ध नाही म्हणून तुम्हाला सांगितल. ते इरकरने सांगितल. आपली त्यांच्याकडे मागणी केल्यानंतर परवा दिवशी संध्याकाळी इरकर माझ्याकडे येऊन बसले होते. त्यांनी सांगितल की, त्यांच्यामुळे जेवढी रिक्वायरमेंट आहे.त्या रिक्वायरमेंटपेक्षा त्यांच्याकडे १२ सुरक्षा रक्षक ज्यादा ठरतात. उपलब्ध करुन दिलेली त्यांना म्हटल. तुम्हाला ज्या-ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या-त्या ठिकाणी तुम्ही त्यांच्या नियुक्त्या करा. आणि जे अजून शिल्लक राहत असतील ते परत द्या. आता तुम्ही म्हणतात की, इरकर ने सांगितल ........................

**राजेश वेतोसकर :-**

नाहीच म्हणून बोलले. तुम्हाला कोणी सांगितल की, माझ्याकडे एक्स्ट्रा आहे म्हणून.

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

कुरळेकर साहेब, जे ७२ सुरक्षा रक्षक आहेत त्या ७२ सुरक्षा रक्षकांची त्या उद्यानासाठी त्यांच्या नियुक्त्या करा. त्या नियुक्त्या करताना पहिल्या पाळीवर सुरक्षा रक्षकाची आवश्यकता नाही. त्यावेळी सगळे बागमजूर तिथे काम करत असतात. दुसऱ्या आणि तिसऱ्या पाळीत सुरक्षा रक्षक ठेवायचे आहेत. उद्यानाची नावे लिहा. त्यांच्या दोन पाळ्यामध्ये संख्या निश्चित करा. सरप्लेस राहिलेले तुम्ही आस्थापना विभागाकडे सरेन्डर करा. अजून पाहिजे असतील तर त्याप्रमाणे मागणी करा.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, प्रायोरिटीवर अस करायच आहे की, आता सध्या ह्या सुट्टीच्या काळामध्ये येणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. तर ६ ते ८ यावेळेस तरी कमीत कमी दोन सुरक्षा रक्षक द्या.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. एकूण ७० सुरक्षा रक्षक उद्यान विभागासाठी देण्यात आलेले असतात. अशी आस्थापना विभागाने माहिती दिलेली आहे. हा फक्त ७० चा आकडा दिलेला आहे. त्या सुरक्षा रक्षकाचे नाव किंवा त्यांची नेमणूक कोणत्या उद्यानामध्ये याबाबतची माहिती अद्याप अप्राप्त आहे. या बाबतचे तीन पत्र आस्थापना विभागात देण्यात आलेले आहेत. त्यांची नाव आणि सध्या कोणत्या विभागात कोणत्या पाळीमध्ये कामाला आहेत. त्या बाबतच्या माहितीचे तीन पत्र असणार. ते पत्र आस्थापना विभागात देण्यात आलेली आहे. त्यामुळे सुरक्षा रक्षक किती ठिकाणी आहे. आणि कोणत्या उद्यानात आहे आणि कोणत्या पाळीत आहेत. याबाबतची माहिती उद्यान विभागाकडे नाही आहे. याची उपस्थिती सुध्दा संबंधित सुरक्षा रक्षकाची उपस्थितीचा दरमहिन्याचा अहवाल उपस्थित होते नव्हते कोणत्या उद्यानात होते या बाबतचा कोणताही अहवाल आस्थापना विभाग उद्यान विभागाला दिला जात नाही. मी हजर झाल्यापासून ही दिला नाही.

**रोहिदास पाटील :-**

ते मागतात त्यांना देत नाही. देत नाही हे निवेदन झाले, रेकॉर्डींग झाले. डिपार्टमेंटमध्ये जर असे चालेल मग आम्हाला काय? आम्ही कोणाला उत्तर द्याचे? आम्हाला विचारणारे नागरीक आहेत.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

काकांनी फार चांगला प्रश्न विचारला आहे. समन्वयाचा आभाव. आता एक काम करतो त्याला एक तोडगा आहे. ते ७० सुरक्षा रक्षक हेड ऑफीसमध्ये बोलवतो. मी त्यांना सोबत घेवून ह्यांच्यासमोर उभा करतो.

**प्रमोद सामंत :-**

मा. ढगे साहेब, तुम्ही अशी कुठे स्टोरी सांगतात की, ७० सुरक्षा रक्षक इथे बोलावतो त्यांना त्यांना दोखवतो हा विषय नाही आहे. विषय असा आहे की, त्यांनी ७० लोक दिली, त्या ७० लाकांची नावे त्यांना दिली पाहिजे आणि तिथे जे सुरक्षा रक्षक, सुरक्षा अधिक्षक असतील त्यांनी ते फॉलोअप घेतला पाहिजे, ते आहे की नाही? ही स्टोरी सांगायची नाही. आधी बजेटच्या मिटींगमध्ये पण विषय झाला होता की, समन्वय पाहिजे. त्यांना माहिती पाहिजे. त्यांनी अटेन्डन्स घेतली पाहिजे. तर हे सगळं बघा तुम्ही. तुम्ही त्या लोकांचे अटेडन्स घ्या.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आता सध्या नविन चार उद्यान आपल्याकडे आलेली आहेत. पूर्वी ४७ होती आता जवळपास ४-५ उद्याने घेवून ५१ चा फिगर आहे. ५१ उद्यानामध्ये आणि मैदानामध्ये १३ मैदाने आहेत आपल्याकडे त्या मैदानाचा चार्ट मी बनवला आहे. त्याच्यामध्ये पहिल्या पाळीत आवश्यक असल्यास त्या ठिकाणी दुसऱ्या आणि तिसऱ्या पाळीत सुरक्षा रक्षक आम्हाला कसे लागतील, त्याचा पुर्ण आकडा मी सामान्य प्रशासन, आस्थापना विभागास २-३ दिवसात कळवेन. त्यासाठी आमची आवश्यकता एवढी आहे, मग कुठे व्यक्तीचे नाव जरी सुरक्षा रक्षक मध्ये येत नसेल किंवा नाव बदलत असतील, की ह्या व्यक्तीच्या ऐवजी दुसरा व्यक्ती येतो त्या उद्यानामध्ये. तर नुसता

आकडा देवून चालणार नाही. ते सुरक्षा रक्षक कोणत्या उद्यानात कार्यरत आहेत हे तरी देणे आवश्यक आहे. आणि ह्यांची उपस्थिती आहे ती दोन ठिकणी घेण्याचे प्रयोजन मी केलेले आहे. एक नगरभवनमध्ये, प्रभाग समिती कार्यालय १ आणि २ साठी आणि प्रभाग समिती कार्यालय ३ व ४ मध्ये उद्यान अधिक्षकाकडे रोज उपस्थिती घेण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी कळकळीने मागीतले की नाही. अशी सुरुवात करा की तुम्हाला जे पाहिजे कुठूनही देतो.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही त्यांना एक गार्ड त्वरीत दिला पाहिजे. तुम्ही त्यांच्याकडे मागणी करा आणि ते तुमची मागणी मान्य करतात की नाही लगेच कळवा. तुम्हाला आता सांगा मागणी मान्य नाही आहे ती. हा एक मुद्दा झाला. दुसरा मुद्दा जी इंटरनल हजेरी लावायची आहे ते तुम्ही प्रभाग कार्यालयात लावून घ्या. दोन दोन ठिकाणी मुख्य कार्यालयात लावणार, प्रभाग कार्यालयात लावणार मग ते साईडवर जाणार असे शक्य नाही. पण तुम्ही एक व्हिजीट ठेवायची, चेक करायचे, व्हेरीफाय करायचे, असेल तर ठिक आहे. नसेल तर अपसेंट मारायचे आणि हा सुरक्षा रक्षकांचा ठेका आपण दिलेला आहे. त्याची आपण पुढची पुन्हा मंजूरी दिली का? की नाही दिली? आपण तसेच चालवतो. स्थायी समितीची मंजूरी घेतली नाही माझ्यामते.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

उद्यापासून मी चेक करायला येणार.

**राजेश वेतोसकर :-**

माझा मुद्दा तसाच राहिला. तुम्ही कधीपासून देणार दोन सुरक्षा रक्षक?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

सुरक्षा रक्षक ७० व्यतिरिक्तचे आता मला सांगता येणार नाही. आस्थापना विभागाकडे माहिती असणार आहे. परंतु दोन सुरक्षा रक्षक आवश्यकता असल्यास तसे तात्काळ पत्र आस्थापना विभागाला देण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना दोन गार्ड तरी द्या.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

मी ईरकरला बालावून घेतले आहे. तुमची जी मागणी होती की, उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे त्या उद्यानात खुप गर्दी होते. त्या दिवशी संध्याकाळी १-२ सुरक्षा रक्षक जादा ठेवणे गरजेचे आहे. त्यांना मी नियोजन करुन दिलेले आहे. हे तुझ्याकडे जे ७० सुरक्षा रक्षक आहेत ते सकाळच्या पाळीमध्ये किंवा ज्यावेळी मजूर असतात हे १२ सुरक्षा रक्षक कमी करा आणि ज्या ठिकाणी जिथे आवश्यकता आहे, मागणी आहे, खरोखर तिथे निकट आहे तिथे त्यांच्या ड्युट्या लावा.

**रोहिदास पाटील :-**

सदस्यांनी मागितलेल्या मागणी बद्दल तुमची खात्री पटली की नाही पटली.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

पटली.

**रोहिदास पाटील :-**

पटली ना. मग होय म्हणावे लागेल ना. आवश्यक असेल तर असं जे बोलता ते बरोबर नाही ना. त्यांना उद्या २ सुरक्षा रक्षक द्या हे रेकॉर्डवर येऊ द्या.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

तुम्ही कन्फ्युजन करु नका. प्रत्येक कामगाराचे त्या त्या विभागाने त्याचे सुपरव्हिजन करायचे आहे. त्यांना योग्य त्या सुचना दिलेल्या आहेत. त्यांनी त्याचे नियोजन करुन जर त्याची दखल घेऊन कार्यवाही नाही केली तर त्याच्या बाबतीत त्यांच्या निष्काळजी आणि हलगर्जी पणामुळे कारवाई करण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

तुमचे असे मत आहे की, ते आवश्यक मागतात? गरजेपैकी जास्त मागतात? तुमचे काय मत आहे? जे चालु होते त्याचेच अपसेंट मागतात ना की, ॲडीशनल मागतात?

**राजेश वेतोसकर :-**

ॲडीशनल नाही. काका तिथे फक्त एकच माणूस आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब, चांगले उद्यान बनवले आहे. लाखो रुपये खर्च केलेला आहे. तर सुरक्षा रक्षक द्यायला काय हरकत आहे.

**शरद पाटील :-**

आपण जेव्हा सुरक्षा रक्षकांची मंजूरी दिली तेव्हा गार्डनच्या सुरक्षा रक्षकासाठी मंजूरी दिली की नाही ते पहिले सांगा.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

दिली आहे.

**शरद पाटील :-**

मग, त्या गार्डनमध्ये सुरक्षा रक्षक का नाही?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्या गार्डनमध्ये सरक्षा रक्षक का नाही, तिथे सुरक्षा रक्षक आहे. त्यांचे म्हणणे आहे की आता उन्हाळ्याची सुट्टी असल्यामुळे एका ऐवजी दोन सुरक्षा रक्षक ठेवा.

**शरद पाटील :-**

एकाचे दोघे नाही, तिथे ३ ड्युटी लागलेल्या असतात. सगळीकडे ३ ड्युटी असतात. एका ड्युटीत तो एकटा करुच शकत नाही.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आपण तिथे मैदान पण विकसीत केले आहे. मैदानात द्या, आम्हाला वाढवून द्या.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

तिथे तर द्यायला सांगितले आहे.

**शरद पाटील :-**

दोन पाळीला माणूस पाहिजे ना. एक माणूस किती ड्युटी करेल, किती तास बसेल?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

संध्याकाळच्या पाळीला एक आहे. ३ पाळ्यांमध्ये ३ आहेत.

**शरद पाटील :-**

३ पाळ्यांमध्ये ३ सुरक्षा रक्षक आहेत का?

**राजेश वेतोसकर :-**

दोनच आहेत.

**विलास ढगे मा. उपायुक्त (मु.) :-**

आपल्याला सगळ्यात जास्त ह्या गोष्टीची चर्चा करायला लागते ते माहित आहे का? संबंधित विभाग प्रमुख तिथे जातीने काय आहे ते प्रत्यक्ष पाहत नाही. एका उंटावर बसून ते अकले सारखे उत्तर देत असतात. मी त्यांना बसून पहिले सांगितले की, तिथे मागणी आहे तर तिथे ते द्या.

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, हे त्यांचा सगळा लेखाजोखा घेतला जाईल. कोण अटेडन्स घेईल ते सगळे बाजूला राहू दे. मला दोन अतिरिक्त सुरक्षा रक्षक भेटतील की नाही?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

भेटतील.

**राजेश वेतोसकर :-**

कधीपासून भेटतील?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

कालपासून तुम्हाला द्यायला पाहिजे होते. उद्यापर्यंत आता त्यांनी द्यायला पाहिजे.

**राजेश वेतोसकर :-**

काल तर मी तुम्हाला समोर फोन केले?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

परवा दिवशी मी त्यांना सांगितले होते.

**राजेश वेतोसकर :-**

कालपर्यंत कोण नाही आले, आज पण कोण नाही येणार.

**शरद पाटील :-**

सावंत साहेब आले आहेत. फेरीवाल्यांचा विषय घेऊ या आता.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

अनधिकृत फेरीवाल्यांमध्ये दोन भाग आहेत. अनधिकृत फेरीवाल्यांच्या बाबतीत आणि बाजार वाढीव वसुलीबाबत असे दोन विषय आहेत. ना फेरीवाला क्षेत्रामध्ये अतिक्रमणाच्या पथकामार्फत कार्यवाही करण्याचा इन्डीपेन्डट विषय आहे. अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करणे किंवा प्रभाग अधिका-यांमार्फत, ज्याचे उत्तर मला देता आले नाही. तो विषय असा आहे की, ना फेरीवाला क्षेत्रामध्ये बाजार भाडे वसुली कंत्राटदार जे वसुली करतात, त्याबाबत करावयाची उपाययोजना कार्यवाही काय आहे त्याचे आपण जरा निवेदन द्या.

**दिपक सावंत :-**

ना फेरीवाला क्षेत्र आपण घोषीत केलेले आहे. त्या क्षेत्रामध्ये पैसे वसुल करु नये म्हणून त्यावेळेस आपण आदेश दिला होता. त्यावेळेसच सर्व ठेकेदारांना बोलवून तुम्हाला जे फेरे क्षेत्र डिक्लर केले. तिथूनच बसावे अशी सुचना दिलेल्या आहेत. आणि जे ना फेरीवाला क्षेत्र आहे त्या ठिकाणी दररोज कारवाई करण्याची आयुक्तांनी सुध्दा संबंधीतांना फेरीवाला पथकाला आदेश दिले आहेत. म्हणजे फक्त तिथुनच वसुल करा अशी मिटींग घेवून सर्व ठेकेदारांना सुचित केलेले आहे.

**शरद पाटील :-**

पण जे वसुली करतात त्यांचे काय?

**दिपक सावंत :-**

त्यांच्यावर कारवाई करायची.

**शरद पाटील :-**

कधी?

**प्रमोद सामंत :-**

आतापर्यंत तुमच्याकडे तक्रारी आल्या नाहीत का?

**दिपक सावंत :-**

कारवाईचा विषय माझ्याकडे नाही.

**प्रमोद सामंत :-**

ना फेरीवाला क्षेत्राबद्दल तक्रारी आलेल्या आहेत की नाही?

**दिपक सावंत :-**

तक्रारी आलेल्या आहेत.

**प्रमोद सामंत :-**

पुढे सोक्ष-मोक्ष काय झाला?

**दिपक सावंत :-**

जे ना फेरीवाला क्षेत्र आहे, तिथे जी कारवाई करायची आहे म्हणजे जे फेरीवाले बसतात त्यांच्यावर..........

**शरद पाटील :-**

त्यांच्यावर कारवाई करा. याच्याबद्दल बोलत नाही.

**प्रविण पाटील :-**

अनधिकृत फेरीवाले आणि आपला ठेकेदार तो तिथे अनधिकृतवाले............

**दिपक सावंत :-**

बसूच द्यायचे नाही असे ठरलेले आहे.

**शरद पाटील :-**

बसूच द्यायचे नाही तो भाग वेगळा. तो अतिक्रमण करेल. आपल्या ॲग्रीमेंटमध्ये काय आहे की, ह्या फेरीवाल्या क्षेत्रामध्ये ठेकेदाराने पैसे वसुल करायचे नाही. फेरीवाले बसतात, नाही बसत तो भाग वेगळा.

**दिपक सावंत :-**

साहेब, बसूच द्यायचे नाही त्यांना.

**शरद पाटील :-**

बसून द्यायचा नाही तो भाग त्यांचा आहे. ठेकेदार वसुल करु शकतो का? असे ॲग्रीमेंटमध्ये आहे?

**दिपक सावंत :-**

नाही.

**शरद पाटील :-**

मग, तुम्ही ठेकेदारावर कारवाई काय केली?

**प्रमोद सामंत :-**

आणि त्या ना फेरिवाला क्षेत्रामध्ये ते ठेकेदाराच गाड्या लावतात त्या ठेकेदारावर तुम्ही काय कारवाई करणार?

**शरद पाटील :-**

त्या ठेकेदारावर कारवाई काय करणार ते सांगा तुम्ही आम्हाला.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

यामध्ये सगळ्यात महत्वाचा प्रश्न असा आहे की, ना फेरिवाला क्षेत्रामध्ये कार्यवाही प्रत्यक्ष करायला गेल्यानंतर त्या लोकांनी नगरपालिकेची बाजार भाडे पावती भरलेली दाखवली. तर ते काय म्हणतात की, तुम्ही आमच्याकडून बाजार भाडे पण वसूल करतात. आणि आमच्यावर कारवाई पण करता.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आता तुम्ही मान्य केल की, तिथे वसुली करतात. म्हणजे ठेकेदार तिथे वसुली करतात हे मान्य केल.

**मुन्ना सिंग :-**

डेली का काम है उनका पावती लेना।

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. सभापती साहेब, माझ एक निवेदन आहे समितीला की, सर्व नागरीकांच्या, सर्व पदाधिका-यांच्या गेले सहा महिन्यांपासून अतिक्रमणाबाबत कारवाई केली जात नाही. परंतु हे बाजार ठेकेवाले त्यांच कामकाज सुपर

व्हिजन नियंत्रण हे माझ्याकडे नाही. माझ्याकडे म्हणजे उपायुक्त (मु.) ला नाही आहे. तर उपायुक्त (मु.) ला डिलीगेशन भेटायला आले. तर त्यांची तक्रार अशी होती की, अतिक्रमणामार्फत तुमची इतकी जोरात कारवाई होते की, त्यामुळे बाजार भाड आम्हाला वसूली करण परवडत नाही. आणि नगरपालिकेला तेवढ देण होत नाही. त्यांच म्हणन अस होत त्यांची तक्रार कशी आहे बघा. उलट की, तुम्ही अतिक्रमणामार्फत फेरिवाल्यावर तुम्ही दररोज नियमित कार्यवाही केल्यामुळे आम्हाला बाजार भरणा वसूल होत नाही. त्यामुळे नगरपालिकेशी करारनामा केलेले रक्कम आम्हाला देण होत नाही. तुम्ही लिखित देऊन टाका आम्हाला परवडत नाही.

**प्रमोद सामंत :-**

त्यांना माहित होत ना की, हे ना फेरिवाला क्षेत्र आहे. इथुन वसूली आपल्याला मिळणार नाही. अस असताना जर त्याने ठेका घेतला तर ती त्यांची चुकी आहे. त्यांची जबाबदारी आहे. त्याने तेवढे पैसे वसूल करा.

**शरद पाटील :-**

त्यांची जबाबदारी बरोबर आहे. पण आपले अधिकारी काहीच करत नाही ना. आपण त्यांच्यामध्ये क्लिअर कट लिहिल आहे. ना फेरिवाला क्षेत्रामधून पैसे वसूल करायचे नाही. त्याच्यानंतर ही त्याने ठेका घेतला आहे. मग त्याच्यावर अजूनपर्यंत कारवाई का करत नाही?

**प्रशांत दळवी :-**

मला एक सांगा, आपले जे एच.ओ.डी. विभाग प्रमुख आहेत इकडे ना फेरीवाला आणि फेरीवाला क्षेत्र हे त्यांनी दाखववावे कुठे आहे का? ते धोरण निश्चित झालेले आहे का?

**प्रमोद सामंत :-**

हो झाल आहे.

**प्रशांत दळवी :-**

कुठे आहे कुठल्या साईडला आहे दाखवाव? मी मिरारोड विभागाला मागणी केलेली आहे. प्रत्येक वेळेला प्रत्येक कमिशनर हा चेंज होत असतो. आणि त्यांची पूर्ण आखणी साहेब, चेंज झालेले आहे. शिवमूर्ती नाईक साहेब असताना वेगळ झाल आहे. विक्रम कुमार साहेब असताना वेगळ झालेल आहे. सांगाव ना कोणी मला.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रशांत दळवी साहेब, तुमच्या मिरारोडच चेंज झाल असेल. पण बी.पी. रोडच आज वर्षानुवर्षे तसेच आहे ते तुम्ही काहीच करु शकत नाही. बी.पी. रोड, नवघर रोड, केबीन रोड हे कंम्प्लीट ना फेरिवाला क्षेत्रामध्ये आहे ते, तरी त्याच्यावर का कारवाई होत नाही?

**दिपक सावंत :-**

ह्याच्यामध्ये काय आहे २००८ साली मा. महासभेने ठराव केला. आणि त्याच्यामध्ये जे क्षेत्र डिक्लेर केले की, हे फेरिवाले क्षेत्र हे ना फेरिवाले क्षेत्र. जेव्हापासून महापालिका प्रत्येक वर्षी टेंडर निघते, लिलाव होतो त्याच्यामधून फक्त फेरिवाला क्षेत्रामधूनच वसूल होतो. हा विषय आला की, त्यांना ना फेरिवाला क्षेत्रामधून वसूल करतो. फक्त कारवाई त्या बसणाऱ्यावर करेल. पण तो ठेकेदार वसूल करेल त्यावर काय कारवाई केली? तर ते सर्व वॉर्ड ऑफिसर आहेत. इथे फेरिवाले पथक आहे. त्यांच्या मार्फत जे रोड आहोत. त्यांना रोड देतो. तिथे जे फेरिवाले बसतात. तिकडून जर ठेकेदार वसूल करताना दिसले तर तो रिपोर्ट घेऊन पुढची कारवाई करु.

**प्रमोद सामंत :-**

आतापर्यंत आपण हे केल नाही का? आज विषय आल्यानंतर करता तुमच्याकडे तक्रारी आल्या. त्याचवेळी तुम्ही सांगितल पाहिजे होत.

**शरद पाटील :-**

तुम्ही त्याच्यावर कारवाई कधी केली ते सांगा ना. म्हणजे हा आज नाही विषय आला आपला. पहिल्याच मिटींगला विषय चालू झाला. तो आतापर्यंत आला तेव्हा तुम्ही एवढ्या महिन्यात काय कारवाई केली त्या ठेकेदारावर ते सांगा ना.

**दिपक सावंत :-**

ठेकेदारांना नोटिस वगैरे दिली आहे. पण, कारवाई बोलता. सगळे जे वॉर्ड ऑफिसर आहेत. ते फेरिवाला पथक आहे, जिथे-जिथे ना फेरिवाला क्षेत्र आहे तिथे-तिथे थांबून ठेकेदार वसूल करताना दिसला तर त्याचा अहवाल घेतो ना.

**मुन्ना सिंग :-**

सावंत साहब, ठेका बोल रहे है, तो मतलब नगरसेवक झूट बोल रहे है की ना उधर है। आप ऐसा कैसा बोल रहे है की, आपको अगर दिखा तो ही कारवाई करेंगे।

**प्रमोद सामंत :-**

तुमच्याकडे तक्रारी कधीपासून आहे. आता तुम्हाला दोन वर्ष झाली.

**दिपक सावंत :-**

त्याच्यामध्ये कस आहे वसूली करताना तिथे ना फेरिवाला क्षेत्रात त्या ठेकेदाराची माणस वसूली करताना दिसली. एकतर त्यांना बसवून द्यायच नाही.

**शरद पाटील :-**

त्यांच्यावर लक्ष कोण देईल?

**दिपक सावंत :-**

फेरीवाला पथक वॉर्डमध्ये आहे ना.

**शरद पाटील :-**

आणि वसूली करताना इमिजिएटली दाखवले तर तुम्ही त्याच्यावर कारवाई काय करणार?

**प्रशांत दळवी :-**

तुम्ही २००८ प्रमाणे म्हटल ना तर त्याचा प्लान तयार आहे का आपल्याकडे?

**दिपक सावंत :-**

हो आहे. २००८ चा जुना प्लान आहे.

**प्रशांत दळवी :-**

तो तसाच आहे ना की, त्याच्यात बदल झालेला आहे.

**दिपक सावंत :-**

बदलला आहे.

**प्रशांत दळवी :-**

मग, सगळ्या विभाग प्रमुखांना तस द्याना. २००८ च्या ज्या फेरिवाला क्षेत्राच जे धोरण निश्चित झाल आहे. मा. महासभेने केल आहे तर त्याचा प्लान आहे का?

**दिपक सावंत :-**

हो आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्याच्यामध्ये आता काही बदल केलेले आहे का?

**दिपक सावंत :-**

पण, त्याच्यात नविन एरिया वाढलेला आहे. त्याच इन्क्लूड केलेल नाही.

**प्रशांत दळवी :-**

इन्क्लूड करायला पाहिजे तेच तर आम्ही म्हणतो.

**दिपक सावंत :-**

नविन एरिया इन्क्लूड नाही.

**प्रशांत दळवी :-**

त्याच्यामध्ये आणखीन भर पडली आहे ना.

**प्रमोद सामंत :-**

ठिक आहे. भर पडली असेल पण शेवटी कुठेतरी ना फेरिवाला क्षेत्र आहे.

**मुन्ना सिंग :-**

जिस आदमी को हम पकडेंगे ना वह आपको बोलेगा की, ठेकेदार का आदमी नहीं है, वह वैसे ही वसुल कर रहा था।

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानीने बोलतो, आपण कुणीही जाण्याची गरज नाही. आमचे जे प्रभागामध्ये फेरिवाले पथक आहे त्याच्या मार्फत करणार.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

सावंत साहेब, मी तुम्हाला सांगतो. बाजार भाडे ठेकेदार हा कर विभागाचा भाग आहे. त्या कर विभागाचा त्याला कॉन्ट्रॅक्ट दिलेला आहे. कर निरिक्षकांनी तो बाजार कर ह्या त्यांच्या क्षेत्रामध्येच वसूल करतो का होता. आणि तो बाहेर करतो की नाही ह्याची तपासणी ही कर निरिक्षकांनीच करायची त्याच मॉनिटरिंग बाजार भाड, कर वसुलीच काम हे तो नियमित पैसे भरतो का आणि त्या करारनाम्याच अनुपालन करतो की नाही हे कर लिपिक किंवा कर निरिक्षकांनीच करायच आहे. अतिक्रमण विभागामधला ज्या पथकातली काम आहेत त्यांच त्यांना ते इन्डीपेन्डंटली काम करू द्या. ते करतात की नाही त्यांच अंकुश ह्यांनी मला मॉनिटरिंग करताना काही सुचना सभागृहाला दिलेल्या आहेत. त्या पथकाबाबत काय कार्यवाही करायची त्याची दखल काय घ्यायची आता कर विभाग आणि अतिक्रमण विभाग हा वेगळा आहे. ते दोन्ही मिक्स अप करू नका. ते तो ठेकेदार योग्य रित्या काम करतो की नाही. तेवढ तुम्ही त्याच मॉनिटर करा. अयोग्य करत असेल त्याच उल्लंघन करत असेल तर तो काय उल्लंघन करतो ते तुम्ही ज्यांनी त्यांची निविदा मंजूर केली त्यांच्यापुढे सादर करा.

**मुन्ना सिंह :-**

मा. सभापती साहब, पिछले स्टॅडिंग में बात हुआ था की सबको लिस्ट देंगे। तो वह कौनसा झोन है फेरिवाला झोन है या बिना फेरिवाला झोन है।

**दिपक सावंत :-**

ठराव आहेत त्याची कॉपी मागवतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही एकदाच निवेदन करा. काय करणार तेवढ निवेदन करा. मी दुसरा विषय चालू करतो. सभागृहाच्या भावना लक्षात घेवून तुम्ही तुमच काय कर्तव्य दक्ष दाखवणार.

**दिपक सावंत :-**

ना फेरिवाला क्षेत्राबाबतीत आताच उपायुक्त (मु.) यांनी सुचना दिले की, ते कर विभागामार्फतच व्हायला पाहिजे. फेरीवाल्यांच्या मार्फत नाही व्हायला पाहिजे. त्याप्रमाणे जे निरिक्षक आहेत त्या एरियातल्या त्या प्रत्येक निरिक्षकाला आणि लिपिकाला आम्ही तिथे पाठवतो. जे-जे ना फेरिवाला क्षेत्र आहे ते त्यांच्याकडून अहवाल मागवून घेतो आणि उचित कारवाईसाठी आयुक्ताकडे सादर करतो. जर तिथे वसूल करत असेल तर त्याचा ठेका रद्द करण्यासाठी आयुक्तांकडे सादर करू.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब मी एका विषयावर सगळ्यांच लक्ष वेधतो आपण जी.पी.आर.एस. सिस्टमही पैसे देवून खरदी केली ना. इथे सभागृहामध्ये तुम्ही सांगता  जी.पी.आर.एस. सिस्टम नाही. काय कुठे चालते ते अस दिसते. आणि त्यासाठी गटनेते सांगतात लॅपटॉप पाहिजे. लॅपटॉप पाहिजे. आपली बस जी चालते २३ नंबरचा रुट किती तारखेला बंद झाली तुम्हाला माहित आहे का ?

**दिपक सावंत :-**

जी.पी.आर.एस. सिस्टमच्या बाबतीत तुम्ही विषय घेतलेला आहे जी.पी.आर.एस.चा कधीचा डेट पाहिले २३ नंबरची बस असेल जेवढा वेळ ट्रॅव्हल केल असेल तो सर्व डाटा सर्वरला आहे म्हणजे ज्यावेळी बंद झाली त्यावेळेपासून बंद असणार.

**रोहिदास पाटील :-**

१ एप्रिल ला बस सुरू झाली. मी तुम्हाला २२ एप्रिलला विचारल. ती बस चालू आहे की नाही ते तुम्हाला माहित नाही. मी तुम्हाला पत्र दिल. तुम्ही सांगितल की मी त्यांना पत्र देतो बस चालू करतो पण आजही ती बस चालू नाही आहे. मग, त्या सिस्टमचा उपयोग काय? बसचा उपयोग काय ? त्या कॉन्ट्रॅक्टरचा उपयोग काय? नंतर तुमचा उपयोग काय आम्हाला?

**दिपक सावंत :-**

आपण तीन बसेसची मागणी केली होती त्यातल्या दोन बसेस चालू केल्या.

**रोहिदास पाटील :-**

आता एक पण बस नाही. महापालिकेची १ एप्रिल पासून बस सेवा बंद आहे. ही बातमी मोठी नाही आम्हाला पेपरमध्ये बातमी दयायची आहे. माझ्या बातम्या जास्त येंत नसतात. पण ही बातमी नाही का? बस सिस्टम सुरू आहे आणि एक रुट बंद आहे. मग तुम्हाला त्याची माहिती नाही. माहिती पडल्यानंतर त्याच ताबडतोब इम्प्लीमेन्टेशन व्हायला पाहिजे. तुम्ही सांगितल आणि त्या ठेकेदाराने व्यवस्था करायला पाहिजे, अस तुम्हाला वाटत नाही का ?

**दिपक सावंत :-**

दुसऱ्या दिवशी चालू केली ना.

**रोहिदास पाटील :-**

नाही केली. आज पण नाही चालू. आता फोन करून विचारा की बस चालू झाली आहे का? जर चालू झाली असेल तर मी कान पकडतो.

**दिपक सावंत :-**

आता जायचच आहे ना तिकडे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जा किंवा नका जावू. पण तुम्ही फोन करून विचारा ना .

**दिपक सावंत :-**

मी २३ नंबरच रजिस्टर मागवल आहे.

**रोहिदास पाटील :-**

जी.पी.आर.एस. सिस्टमवर बघा तुम्ही निवेदन केल होत की नाही कोणती बस कुठे चालते ते.

**दिपक सावंत :-**

जी.पी.आर.एस मध्ये फक्त त्या बसचा नंबर येतो, त्याच ट्रॅव्हल्स कुठून कुठे केली त्याच फक्त नंबर येतो. की ही बस इथून एवढ्या एवढ्या कि.मी. वर चालली.

**रोहिदास पाटील :-**

आली आहे की बघा. ती बस आता ही नाही चालू.

**दिपक सावंत :-**

साईटवर चला ती तिथे बस आहे.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्या रूटवरची जी बस आहे ती बंद करण्यात येत आहे अशी काही पूर्व सुचना त्यांनी तुम्हाला दिली आहे का?

**दिपक सावंत :-**

नाही.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

पुर्व सुचना न देता बंद केली असेल तर आपण त्या ठेकेदारा बरोबर संवाद साधला आहे का?

**दिपक सावंत :-**

हों.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

बरं जर बंद केली असेल तर का केली? आता ती तात्काळ चालू कर असं सांगितल आहे का त्यांना. बरं चालू केल्यावर तुम्ही फिडबॅक घेतला का चालू करा म्हणून.

**दिपक सावंत :-**

दुसऱ्या दिवशी त्यांनी एक बस चालू केली होती. मला त्यांनी सांगितल होत.

**रोहिदास पाटील :-**

एक पण चालू नाही केली.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.) :-**

तुम्ही खातर जमा करा ना. काका एवढे खात्रीशीर सांगतात आणि ठेकेदार म्हणतात चालू केली. कुठला तरी कुठे फरक पडतो ना.

**रोहिदास पाटील :-**

२३ नंबर रुट इंद्रलोक वरुन मिरारोडला जातो. असा तो रुट आहे. एकदम सोयीचा रुट आहे. लोकांना उपयोगी पडणारा रुट आहे. आणि त्याच्याही पलीकडे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सोयीचा रुट आहे. तो कोणताच काम नीट करणार नाही. ती बस सुटेल याची खात्रीच नाही तर लोक थांबतील कसे. उपायुक्त साहेब, तुमचा टाईम टेबल नक्की लागला पाहिजे. लोकांना तुमचा विश्वास वाटला पाहिजे की, बस येणारच आहे.

**दिपक सावंत :-**

२३ नंबर रुटच्या बाबतीत सांगतो. मी सभापतींना सांगितल. आपण तिथेच जाणार आहोत. फेरे जेवढ्या केलेले आहेत. त्याचा सर्व रेकॉर्ड आहे.

**प्रमोद सामंत :-**

१२ नंबर रुट वरची पण बस बंद आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपली महापालिकेची आरक्षणला त्या ठिकाणी आपण संमती दिली. त्या आरक्षणाच्या ठिकाणी बोर्ड लावा. का बोर्ड लावत नाही. आपण पैशाची मंजूरी दिलेली आहे. १० X १२, १० X १५ लोखंडी खांब्याचा हे आरक्षण आहे अस बोर्ड का लागत नाही. लोकांना खात्री तर पटु द्याना. आम्ही १०२ बद्दल आग्रह करतो.

**मा. सभापती :-**

काका ह्या विषया बद्दल आपण नंतर चर्चा करु.

**मा. सभापती :-**

सर्व अवलोकन मंजूर करण्यात येत आहेत.

**प्रकरण क्र. १४ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी जमा असलेले इनर्ट मटेरियल प्रकल्पातील नविन जागेत वाहतुक करणे अत्यावश्यक व तातडीचे बाब असल्याने सदर कामाकरिता सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात नाले सफाई /खोदाई कामातील गाळ माती वाहतुक कामी मंजुर असलेल्या दरात मंजुर ठेकेदाराकडुन दोन टोरस वाहने भाडयाने घेवून इनर्ट वाहतुक करण्याची कामे पूर्ण करणे व याकामी येणा-या खर्चास मा. आयुक्त सो., यांनी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे कामे करून घेण्यात आलेली आहेत.

| क्र. | निविदाकाराचे नाव | कालावधी | कामाचा तपशिल | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि. | दि.०७/३/२०१३ ते दि.३१/३/२०१३ | प्रकल्पातील इनर्ट नविन जागेत वाहतुक करणे. | रु.१,७५,०००/- |

वरीलप्रमाणे कामे करणे अत्यावश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (ड ) अन्वये अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १५ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (संगणक विभाग)

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत इतर विभागांनी मागणी केलेल्या व त्यानुसार खरेदी करण्यात आलेल्या संगणक संचांच्या खरेदीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अनु क्र. | तपशिल | नग | मंजुर दर |
|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परीक्षण, जनसंपर्क, अग्निशमन, सार्वजनिक बांधकाम, विधी, नगररचना इ. विभागांकरीता संगणक खरेदी. | १८ | रु.३९,९००/-(प्रति संगणक संच) महाराष्ट्र शासन दर करार दि.०४/०७/२०१२ अन्वये |

सदरचे संगणक हे महाराष्ट्र शासन दरकरारामध्ये नमुद मंजुर दरांनी तसेच महाराष्ट्र शासन दरकरारामध्ये प्राधिकृत केलेल्या पुरवठादाराकडून खरेदी करण्यात आलेले आहेत. उपरोक्त कामाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १६ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (पाणी पुरवठा विभाग),

**ठराव क्र. १६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ३ येथे इमारत क्र. अे-४६ ते सी-२२ पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | ५,०५,४००/- | मे. गणेश डेव्हेलोपर्स | अंदाजपत्रक दराने |
| २. | मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ७ येथे इमारत क्र. बी-१३ ते डी-१८ व डी-१२ ते डी-१३ पर्यंत बिडाची जलवाहीनी पुरविणे व अंथरणे. | १२,७०,४००/- | मे. गणेश डेव्हेलोपर्स | अंदाजपत्रक दराने |
| ३. | मिरा गाव, मुन्शी कंपाउंड येथे दिल्ली दरबार हॉटेल ते अहमद मश्जिद व शादाब हॉटेल ते सबेरा बिल्डींग पर्यंत बिडाची वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | ५,५१,९८७/- | मे. गणेश डेव्हेलोपर्स | अंदाजपत्रक दराने |
| ४. | भाईंदर (पुर्व) पाटील यादव इंडस्ट्रीयल इस्टेट येथील त्रिमुर्ती इंडस्ट्री येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | ५,२९,३००/- | मे. गणेश डेव्हेलोपर्स | अंदाजपत्रक दराने |
| ५. | भाईंदर (पुर्व) फाटक रोड येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | १२,७२,६००/- | मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दराने |
| ६. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील क्लोरीनेशन प्लांटसाठी वार्षिक क्लोरीन सिलेंडर पुरवठा करणे | १४,७१,५००/- | मे. जी. एस. कमर्शियल कॉर्पोरेशन | अंदाजपत्रक दराने |

वरील कामे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १७ :-**

मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे (भांडार विभाग) - लेखन सामुग्री (स्टेशनरी) खरेदी करणे.

**ठराव क्र. १७ :-**

**विषय क्र. १ लेखन सामुग्री (स्टेशनरी) खरेदी करणे.**

महानगरपालिकेने दि.१२/०४/२०१२ रोजी " फ्रि प्रेस जर्नरल", "मुंबई लक्ष्यदिप" या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदे सुचनेनूसार तसेच E-tendering द्वारे महानगरपालिकेस लेखन सामुग्री (स्टेशनरी) खरेदी करण्याकामी निविदा मुदतीत सादर केलेली आहेत. त्यापैकी पात्र निविदाधारक मे. साई प्रिंटर्स ॲन्ड स्टेशनरी, रोहिणी इंटरप्राईजेस, व्होरा इंटरप्राईजेस, श्री. ए.डी. इंटरप्राईजेस यांनी सादर केलेल्या निविदेतील कमी दरास मा. आयुक्त सो. यांनी दि.०६/०७/२०१२ रोजी वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी दिलेली आहे.

महानगरपालिकेस आवश्यकतेनूसार लागणारी स्टेशनरी खरेदी करण्याकामी अंदाजित रु.२०.०० लाख मर्यादेत खर्च अपेक्षित आहे तरी सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. सदर प्रकरण अवलोकन करण्यात आले.

**विषय क्र.२ विविध प्रकारची नमुने छपाई करणे.**

महानगरपालिकेने दि.२३/०५/२०१२ रोजी " फ्रि प्रेस जर्नरल", "दै. वृत्तमानस" या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदे सुचनेनूसार तसेच Re-tendering द्वारे महानगरपालिकेस विविध प्रकारची नमुने छपाई करण्याकामी संबंधीत ठेकेदरांनी आपली निविदा मुदतीत सादर केलेली आहे त्यापैकी पात्र निविदाधारक मे. वसंत ट्रेडर्स, मे. निलिमा एंटरप्रायजेस, प्रेयस कॉर्पोरेशन यांनी सादर केलेल्या निविदेतील कमी दरास मा. आयुक्त सो. यांनी दि.०६/०७/२०१२ रोजी वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी दिलेली आहे.

महानगरपालिकेस आवश्यकतेनूसार लागणारी विविध प्रकारची नमुने छपाई करण्याकामी अंदाजित रु. २०.०० लाख मर्यादेत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये सदर प्रकरण अवलोकन करण्यात आले.

**विषय क्र.३ वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक पुरवठा करणेबाबत**

महानगरपालिकेने दि.२२/०५/२०१२ रोजी " फ्रि प्रेस जर्नरल" या वृत्तपत्रात महानगरपालिकेतील मा. पदाधिकारी/अधिकारी व महानगरपालिकेचे नगरवाचनालयाकरीता वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक पुरवठा करणेकामी जाहीर निविदा सुचना प्रसिध्द केली होती. त्याकामी संबंधीत निविदाधारक मे. प्रशांत एजन्सी, मे. कल्पीत एजन्सी, मे. किशोर पुजारी, सौ. प्रिती प्रविण भाटकर या चार निविदाधारकांच्या निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या होत्या **त्यापैकी पात्र निविदाधारक सौ. प्रिती प्रविण भाटकर यांनी छापील किंमतीवर १ टक्के सुट तसेच मासिक सेवा वेतन निरंक सुट असलेली वार्षिक निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो.यांनी दि.०६/०६/२०१२ रोजी वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी देण्यात आलेली आहे.**

महानगरपालिकेस वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके व दिवाळी अंक पुरवठा करणेकामी अंदाजित रु. ६.०० लाख मर्यादेत खर्च अपेक्षित आहे तरी सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये सदर प्रकरण अवलोकन करण्यात आले.

**विषय क्र.४ मा. पदाधिकारी/अधिकारी व नगरसेवक यांच्याकरीता लेटरपॅड, व्हीजीटींग कार्ड व इनव्हलप छपाई केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत**

महानगरपालिकेतील मा. पदाधिकारी व नगरसेवक यांना आवश्यकतेनूसार लेटरपॅड, व्हीजीटींग कार्ड व इनव्हलप छपाई करणेकामी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात रु. ५.०० लाखाच्या मर्यादेत खर्च अपेक्षित असल्याने e-tendering द्वारे मागविलेल्या निविदा करीता मे. श्वेता पेपर प्रिंट यांच्या कमी दराच्या निविदेस मा. आयुक्त सो. यांनी दि.०५/०४/२०११ रोजी मंजुरी दिलेली होती.

सदर निविदेकरीता मा. स्थायी समिती ठराव क्र.५९, दि.३०/०८/२०११ ने यापूर्वी अवलोकन झालेले आहे परंतु सदरचा खर्च रु. ५.०० लाखापेक्षा अधिक झालेला असल्याने संबंधीत ठेकेदारांचे उर्वरीत देयक रु.६७,००५/- (रुपये अक्षरी सदुसष्ट हजार पाच मात्र) इतकी रक्कम अदा होणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये सदर प्रकरण अवलोकन करण्यात आले.

उपरोक्त निविदाच्या अवलोकनांस हि सभा मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मा. सभापती साहेब, २ के खाली दोन विषय आलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम कडून निविदेस मान्यता देणे.

**मा. सभापती :-**

हे दोन्ही विषय घेण्यात येत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

१)

| अ.क्र | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | **मिरारोड (पूर्व) सृष्टी ब्रीज पर्यंत नाला बांधणे. (महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान)**<br><br>**१. मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन कं** | **रु. १,६६,९६,०००/-**<br><br>**७.२ % जास्त दराने** |

मिरारोड (पूर्व) सृष्टी ब्रिज येथे आर.सी.सी. नाला बांधणे (अंदाजित खर्च रु. १,६६,९६,०००/-) कामी दि. ०८/०९/२०१२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तथापी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९ % जास्त दर प्राप्त झाल्याने दि. ०१/०१/२०१३ रोजी फेरनिविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर सदर निविदेस दि.१०/०१/२०१३ व दि. १७/०१/२०१३ रोजी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. परंतू सदर कामाकरीता मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन या एकाच कंपनीने निविदा सादर केली. सदर कामी मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन यांनी ७.२ % जास्त दराची निविदा सादर केली आहे. परंतू सदरचे दर हे अवाजवी असल्याने दरवाटाघाटीकरीता दि. १२/०३/२०१३ रोजी संबंधित निविदाधारकास बोलाविण्यात आले असता त्यांनी सदर नाल्याच्या कामाची साईट ही अडचणीची असून कमी दरात परवडणारी नसल्याने दर कमी करण्यास नकार दिला आहे. याबाबत त्यांनी दि. १८/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तरी सदर फेर निविदेस दोनवेळा मुदतवाढ देऊनसुध्दा मे चौधरी कंन्स्ट्रक्शन व्यतिरिक्त इतर कोणीही निविदाधारकांनी निविदा सादर केलेली नाही. तरी मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकातील रक्कमेवर ७.२ % जास्त दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

२)

| **भाईंदर (पूर्व) जैसल पार्क खाडी किनारी जलक्रिडा प्रकल्प चालविणे. (व्दितीय फेर निविदा)** | | दि. ११/१२/२०१२ | दै. नवाकाळ व दै. फ्रि प्रेस जरनल दि. ०३/०३/२०१३ | दि.०४/०३/२०१३ |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Annual Break Up of Revenue given by Tenderer To MBMC in Advance** | Famous Engineers | **Litmus Marine Innovation Pvt.Ltd.** | Creative Inflatables |
| | **Year** | Amount | **Amount** | Amount |
| 1 | 1st Year | 70,000/- | **1,25,000/-** | 80,000/- |
| 2 | 2nd Year | 1,25,000/- | **2,00,000/-** | 1,50,000/- |
| 3 | 3rd Year | 1,90,000/- | **3,25,000/-** | 2,20,000/- |
| 4 | 4th Year | 2,50,000-/ | **3,40,000/-**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**३,५५,०००/-** | 2,90,000/- |
| 5 | 5th Year | 2,90,000/- | **3,60,000/-** | 3,15,000/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **मे. लिटमस मरीन इंन्नोव्हशन प्रा.लि.** यांनी सादर केलेली **वरील जास्त दराच्या** निविदेस मान्यता देण्यास येत आहे. सदर एजन्सीसोबत प्रशासनाने योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यात यावा.

**प्रमोद सामंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

निविदा एकच आली आहे का? ते नियमात बसते का? आमची सुचना आहे. बाकी आम्हाला काही बोलायच नाही. त्याला आमचा कुठल्याही पध्दतीचा विरोध नाही आहे. पण याच्यामध्ये जे नियमात असेल त्या नियमाच्या पध्दतीने करा. अन्यथा ह्याला सदस्य म्हणून आमची जबाबदारी नसेल.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १८ :-**

२के अन्वये प्रस्ताव – निविदेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १८ :-**

१)

| अ.क्र | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) सृष्टी ब्रीज पर्यंत नाला बांधणे. (महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान)<br>१. मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन कं | रु. १,६६,९६,०००/-<br>७.२ % जास्त दराने |

मिरारोड (पूर्व) सृष्टी ब्रिज येथे आर.सी.सी. नाला बांधणे (अंदाजित खर्च रु. १,६६,९६,०००/-) कामी दि. ०८/०९/२०१२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तथापी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९ % जास्त दर प्राप्त झाल्याने दि. ०१/०१/२०१३ रोजी फेरनिविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर सदर निविदेस दि.१०/०१/२०१३ व दि. १७/०१/२०१३ रोजी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. परंतू सदर कामाकरीता मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन या एकाच कंपनीने निविदा सादर केली. सदर कामी मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन यांनी ७.२ % जास्त दराची निविदा सादर केली आहे. परंतू सदरचे दर हे अवाजवी असल्याने दरवाटाघाटीकरीता दि. १२/०३/२०१३ रोजी संबंधित निविदाधारकास बोलाविण्यात आले असता त्यांनी सदर नाल्याच्या कामाची साईट ही अडचणीची असून कमी दरात परवडणारी नसल्याने दर कमी करण्यास नकार दिला आहे. याबाबत त्यांनी दि. १८/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तरी सदर फेर निविदेस दोनवेळा मुदतवाढ देऊनसुध्दा मे चौधरी कंन्स्ट्रक्शन व्यतिरिक्त इतर कोणीही निविदाधारकांनी निविदा सादर केलेली नाही. तरी मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकातील रक्कमेवर ७.२ % जास्त दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

२)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **भाईंदर (पूर्व) जैसल पार्क खाडी किनारी जलक्रिडा प्रकल्प चालविणे. (व्दितीय फेर निविदा)** | | दि. ११/१२/२०१२ | दै. नवाकाळ व दै. फ्रि प्रेस जरनल दि. ०३/०३/२०१३ | दि.०४/०३/२०१३ |
| **Sr. No.** | **Annual Break Up of Revenue given by Tenderer To MBMC in Advance** | Famous Engineers | **Litmus Marine Innovation Pvt.Ltd.** | Creative Inflatables |
| | **Year** | Amount | **Amount** | Amount |
| 1 | 1st Year | 70,000/- | **1,25,000/-** | 80,000/- |
| 2 | 2nd Year | 1,25,000/- | **2,00,000/-** | 1,50,000/- |
| 3 | 3rd Year | 1,90,000/- | **3,25,000/-** | 2,20,000/- |
| 4 | 4th Year | 2,50,000-/ | **3,40,000/-**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**३,५५,०००/-** | 2,90,000/- |
| 5 | 5th Year | 2,90,000/- | **3,60,000/-** | 3,15,000/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **मे. लिटमस मरीन इंन्नोव्हशन प्रा.लि.** यांनी सादर केलेली **वरील जास्त दराच्या** निविदेस मान्यता देण्यास येत आहे. सदर एजन्सीसोबत प्रशासनाने योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यात यावा.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दुपारी १.४० वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**